₹ १०/-

संत निरंकारी (मराठी)

पाने ४४ • वर्ष १९ वे • अंक ४ था • एप्रिल २०१३



संत निरंकारी

देश व विश्वाच्या अकरा भाषेत प्रकाशित

(संत निरंकारी मंडळाचे ध्येय व कार्य आणि संत महापुरुषांची शिकवण देणारे भक्तिमार्गदर्शनपर मराठी नियतकालिक)

वर्ष १९वे | अंक ४ था | एप्रिल २०१३ | पाने ४४

❖ संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव ❖ सहसंपादक - श्री. जगन्नाथ चैतन्य मडकर

अनुक्रमणिका

कायमस्वरुपी

संपादकीय	चंद्रकांत जाधव	४
श्रीगुरुवचनामृत	सद्गुरु बाबाजी	७

लेख

म्हणे अवतार	श्री. स. वि. लव्हटे	५
मातृवचनामृत	निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी	१५
विवेक विचारधारेचा अनमोल खजिना	सौ. सरीता न. तळवडेकर	१७
अनुभवाचे बोल - या! आभार मानूया	श्री. विकास अरोरा	१९
बाबा गुरबचनसिंहजींच्या जीवनाचे विविध पैलू ..	... .	२१
संत निरंकारी मिशनचे समाजोध्दारक कार्य	श्री. संजय तु. जालगांवकर	२५
हीच मानवता	श्री. जनार्दन हा. पाटील	२७
मुद्याची गोष्ट	सौ. रश्मी राजेंद्र थोरात	२८
सामूहिक विवाह	... .	३१
गुरु वंदना समारोह	... .	३२
आयुष्याचा पहिला धडा कर्तव्य होय	सौ. जयश्री रामदास लांडे	३४
कर्तव्याने घडतो माणूस	श्री. तानाजी नारायण शिंदे	३६
कर्तव्यासाठी कर्तव्य	कु. रंजना पिलाजी भांगरे	३८
कर्तव्य मानवाचं - ब्रह्मज्ञान प्राप्तीचं	दिपराज दत्ताराम माने	३९
सद्गुरुवचनाचं पालन हेच आद्यकर्तव्य	कु. सुरज सु. अनभवणे	४०
माणुसकीने वाग मानवा... हेच तुझे कर्तव्य	कु. नितीन प्रकास संकपाळ	४१

गीत/कविता

आपुलकीचा भाव जागवूया सारी	श्री. बाळकृष्ण जयराम कासार	२९
मानव एकता दिवस	कु. सोनाली गु. चव्हाण	३०
मानव	लतिका पालव	३०

लेखकाच्या विचारांशी संपादक सहमत असणे अनिवार्य नाही.

वर्गणी	वार्षिक	आजीवन
भारत	₹ १००/-	₹ १०००/-
इंग्लंड	£ 12	£ 150
युरोप	€ 15	€ 200
अमेरिका	$ 20	$ 250
कॅनडा	$ 25	$ 300

प्रति अंक रु. १०/-

कार्यालय/पत्रव्यवहार पत्ता
पत्रिका विभाग,
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, मुं - १४.
फोन : २४१० ५७ ४९
इंटरनेट: http://www.nirankari.org
ई-मेल: marathi@nirankari.org

मालक : संत निरंकारी मंडळ
संत निरंकारी सत्संग भवन,
माहूल रोड, चेंबूर, मुंबई - ४०० ०७४.
दूरध्वनी : २५५३ १४ ६८

Member of All India Small and Medium Newspapers Association and Indian Languages Newspapers Association

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक आणि प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी हे मासिक प्रॉस्पेक्ट प्रिंटींग प्रेस, कुलकर्णी कॉटेज, गोखले कॉस रोड, दादर, मुंबई - ४०० ०२८, येथे छापून संत निरंकारी सत्संग भवन, ५०, मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई - ४०० ०१४ येथे प्रकाशित केले.

संपादक - श्री. चंद्रकांत अनंत जाधव

संपादकीय

मानवता धर्म

विशिष्ट शरीररचना असलेल्या जीवाला 'मानव' असल्याचं प्रतीक मानता येईल का ?... खरं पाहिलं तर मानवाची ओळख ही त्याच्या शरीरयष्टीवरुन किंवा बुध्दिचातुर्यावरुन होत नसून त्याच्या अंतरंगावरुन होत असते. जसं, साखरेतून गोडवा, फुलामधून सुगंध आणि मिठामधून खारटपणा वजा केला तर या गुणधर्मांच्या अभावामुळे त्या त्या पदार्थांचं अस्तित्वच नाकारण्यासारखं होईल; तसं मानवात जर 'मानवता' या गुणाचा अभाव असेल तर त्याला 'मानव' म्हणणं कितपत योग्य ठरेल ? प्रेम, नम्रता, सहिष्णुता, बंधुभाव, विशालता ही मानवतेची अंग आहेत. या दैवी गुणांचा अभाव असणाऱ्या कोणत्याही नरदेहाला मानव म्हणवून घेण्याचा कुठलाही नैतिक अधिकार उरत नाही, असं संतमत स्पष्ट सांगत आहे.

आज मानव वैज्ञानिक प्रगती साधत उत्तरोत्तर विकासाच्या पायऱ्या चढत आहे. परंतु भौतिक विकासाबरोबरच मानवाचा आध्यात्मिक विकास होणं हेही तितकंच गरजेचं आहे. कारण मानवतेचं मूळ हे अध्यात्मात आहे. जसं, अवतारवाणीतही शहनशाह बाबा अवतारसिंहजींनी म्हटलय -

बिना ज्ञान दा पशु है मानव, बन सकदा इन्सान नहीं
किंवा
ज्ञानाविण जन्म, पशुहूनी हीन

(संत तुकाराम महाराज)

म्हणूनच मानवात मानवता रुजवण्यासाठी अध्यात्माची गरज आहे. अन्यथा मानवता लयास गेली तर सामाजिक बांधिलकीची भावनाच उरणार नाही. लोक स्वार्थी, भ्रष्टाचारी होतील. सर्वत्र हिंसाचार आणि अनाचार माजेल. सर्व सुखसुविधा निर्माण करणारे विज्ञान विधायक न ठरता विध्वंसक ठरेल. दुर्दैवाने आजही असं भयावह चित्र काही ठिकाणी दिसून येत आहे. म्हणूनच सद्गुरु बाबाजी इशारा देतात की,

'भौतिकतेच्या शर्यतीत मानवतेला विसरु नका'

सांसारिक सुखासाठी भौतिक प्रगती साधण्याला कुणाचाच विरोध नाही परंतु या धरतीवर गुण्यागोंविदाने राहून स्वर्गमय जीवन जगण्यासाठी या भावनांचा अंगिकार करणे अत्यावश्यक आहे.

प्रत्येक धर्म, ग्रंथ, सांप्रदाय हे मानवतेचीच शिकवण देतात. जर आपण ईश्वरावर प्रेम करण्याचा दावा करत असू तर आधी या ईश्वराच्या लेकरांवर प्रेम करायला पाहिजे. कवी नीरज यांनी स्पष्ट म्हटलय - 'जो मनुष्यरुपात जन्म घेऊन मनुष्यमात्रावरच प्रेम करु शकत नसेल तर तो ईश्वरावर तरी काय प्रेम करणार ?' एका शायरानही म्हटलय -

क्या करेगा वो प्यार भगवानसे, क्या करेगा वो प्यार इन्सान से।
जन्म लेकर गोद में इन्सान के, कर न पाया प्यार इन्सान से।

मानव ही एकच जात असून मानवता हाच खरा धर्म आहे. हा धर्म जोडणं शिकवतो, तोडत नाही. मनामनातील दरी वाढवणाऱ्या भिंती उभारत नाही तर मानवाला मानवाशी जोडणारा सेतू बांधायला शिकवतो. भूतमात्राविषयी अपार दया भाव निर्माण करतो. पाण्यात बुडणाऱ्या विंचवाला वाचवण्यासाठी त्याचे डंख सहन करुनही तो विंचू जर आपला धर्म सोडत नाही तर मी त्याला वाचवण्याचा माझा धर्म का सोडावा, अशी मनाला दृढता देणारा हा 'मानवता धर्म' आहे आणि भाई कन्हैयासारखं शत्रूलाही पाणी पाजून सर्वत्र भगवद्भाव पाहायला शिकवणारा हा देखील मानवता धर्मच आहे.

आणि याच मानवता धर्माच्या प्रतिष्ठापनेसाठी स्वतःचं जीवन बलिवेदीवर चढवणारे मानवतेचे मसीहा युगप्रवर्तक बाबा गुरबचनसिंहजींच्या योगदानाला अनुसरुनच संत निरंकारी मिशनची वाटचाल सुरु आहे. मानवतेचा भक्कम आधार घेतलेली ही मानव एकतेची वाटचाल एकत्वाकडे अग्रेसर होत राहो, ही सद्गुरुचरणी प्रार्थना!

चंद्रकांत जाधव
snm.jadhavca@gmail.com

भाग-४१

॥ म्हणे अवतार... ॥

मूळ अवतारवाणी

निरंकार नूं जो पहचाणे जूनां दे विच आऊंदा नहीं।
निरंकार नूं जो पहचाणे मरने दा दुख पाऊंदा नहीं।
निरंकार नूं जो पहचाणे हरदम रहन्दा ए मसरुर।
निरंकार नूं जो पहचाणे उस दियां होण बलावां दूर।
निरंकार नूं जो पहचाणे दुख न नेड़े आएगा।
निरंकार नूं जो पहचाणे डर ओहदा मिट जाएगा।
छड दईये जे माण स्याणप फेर हरि दा रंग मिले।
अवतार होए पहचाण प्रभु दी जे साधु दा संग मिले। (पद क्र.34)

मराठी अनुवाद

जो नर जाणे निरंकार हा पुनर्जन्म नाही त्याला।
जो नर जाणे निरंकार हा मरण दुःख नाही त्याला।
जो नर जाणे निरंकार हा सदैव राहे आनंदी।
जो नर जाणे निरंकार हा संकट त्या येई न कधी।
जो नर जाणे निरंकार हा दुःख न येई जवळ कदा।
जो नर जाणे निरंकार हा भय ना बाधे तया कदा।
त्याग करु जर चतुराईचा तरीच हरिचा रंग मिळे।
अवतार प्रभुची ओळख होई जव संतांचा संग मिळे। (पद क्र.३४)

युगपुरुष बाबा अवतारसिंहजी महाराज यांनी या पदामध्ये निरंकार प्रभुला जाणल्याने होणाऱ्या परमलाभाचा उल्लेख केला आहे. ते म्हणताहेत की, ज्याने या ईश्वराला जाणले त्याला पुन्हा जन्म घेण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. मृत्यूच्या दुःखापासूनही त्याची सुटका होते. असा भक्त सदैव आनंदात राहतो आणि त्याच्यावर संकटाची घडी येत नाही. ज्याने या प्रभूला जाणले त्याला दुःख स्पर्श करीत नाही आणि तो निर्भय बनतो. परंतु या हरिच्या रंगामध्ये रंगून जाण्यासाठी आपला चतुरपणा सोडून संतांची संगत धरावी लागेल. संतांच्या संगतीनेच या प्रभुची ओळख होईल.

खरं तर ईश्वर प्राप्ती हा मनुष्य जन्माचा मुख्य उद्देश आहे. ईश्वर प्राप्ती झाली तरच हा जन्म सार्थक मानला गेला आहे. पुन्हा पुन्हा जन्म घेणे आणि पुन्हा पुन्हा मृत्यूला सामोरे जाणे हे दुष्ट चक्र केव्हा सुरु झाले कोणास ठाऊक. पण

या चक्रामध्ये जीव अडकलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. या चक्रातून सुटका होण्यासाठी देवाची ओळख होणे अनिवार्य आहे. जन्ममृत्यूरुपी हा भवसागर पार करण्याचा तोच एकमेव मार्ग आहे. ईश्वर निर्गुण-निराकार असून अविनाशी आहे, अजन्मा आहे. आत्मा हा ईश्वराचाच अंश होय. परंतु अज्ञानामुळे तो बंधनात अडकला असून जीवरुपी अवस्थेला प्राप्त झाला आहे. आत्मा जेव्हा आपले मूळ स्वरुप परमात्म्याला जाणून तद्रुप होतो तेव्हा तोही जन्ममृत्यूरहित निरामय अवस्था प्राप्त करतो. ईश्वराला जाणणारा मनुष्य सदोदित आनंदी असतो याचे कारण ईश्वर आनंदस्वरुप आहे. जीव सत्स्वरुप व चित्स्वरुप आहे. पण ईश्वर सत्, चित् व आनंदस्वरुप आहे. याचाच अर्थ जीवाकडे आनंदाची कमतरता आहे. ईश्वराशी नाते जोडल्याने ही कमतरता भरुन निघते आणि जीव शिवस्वरुप बनून आनंदाच्या डोहात डुंबू लागतो.

ईश्वराचा भक्त झाल्याने जीवनात सुख-दुःख येत नाही अशातला भाग नाही. परंतु भक्त ईश्वराचा अंकित बनून त्यांचा प्रभाव ग्रहण करीत नाही इतकेच. जे काही घडेल त्याला ईश्वरीय इच्छा समजून गोड मानून घेण्याची क्षमता भक्तामध्ये आलेली असते. म्हणूनच तो सुखाला स्वप्नवत तर दुःखाला बुडबुड्यासमान मानत असतो. ईश्वर ज्याप्रमाणे निर्भय आहे, निर्वैर आहे तद्वत भक्तही निर्भय-निर्वैर बनून जातो.

भक्तिच्या बाबतीत मनुष्य फारच चतुरपणा करीत असतो. त्याला त्याच्या सोईचा देव आणि सोईची भक्ती हवी असते. जसा आहे तसा देव आणि यथार्थ भक्तिकडे वळण्याची त्याची तयारी नसते. त्यामुळेच तो खऱ्या अर्थाने हरिच्या रंगात रंगू शकत नाही. हरिरंगात रंगून गेल्याशिवाय वर नमूद केलेल्या गोष्टींचा लाभ त्याच्या पदरात पडू शकत नाही. म्हणून शहनशाहजींनी याठिकाणी हरिच्या रंगात रंगण्यासाठी स्वतःचा शहाणपणा बाजूला ठेवून संतांच्या चरणी लवलीन होण्याचा सल्ला दिलेला आहे. संत नामदेव महाराजांनी आपल्या अभंगवाणीमध्ये म्हटलेही आहे की,

संतांपायी माथा ठेविता सद्भावें। तेणें भेटे देव आपेआप।।

क्रमशः

- स. वि. लव्हटे
जुईनगर, नवी मुंबई

वाचकांना सूचना

संत निरंकारी, हसती दुनिया, एक नजर मासिकांची वार्षिक वर्गणी १ नोव्हेंबर २०१२ पासून रु.१००/- झालेली आहे. वाचक ही गोष्ट ध्यानात न घेता जुन्या दराप्रमाणे रु.६०/- किंवा रु.८०/- वर्गणी पाठवित आहेत. कृपया यापुढे वाचकांनी मासिकांत नोंद केल्याप्रमाणे वार्षिक वर्गणी रु.१००/- पाठवावी.

श्री गुरुवचनामृत



(रविवार, दिनांक ३ मार्च, २०१३ रोजी बिहारची राजधानी पाटना येथे आयोजित बिहार व झारखंडच्या द्विदिवसीय प्रादेशिक संत समागमामध्ये हजारोंच्या संख्येने उपस्थित भाविक भक्तगणांना संबोधित करताना सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज यांनी केलेल्या प्रवचनाचा मराठी अनुवाद.)

संतजनहो, प्रेमाने बोला, धन निरंकारजी।

बिहार-झारखंडच्या प्रादेशिक संत समागमाच्या दुसऱ्या दिवशी देखील हे भव्य स्वरुप साकार झाले आहे, ज्याठिकाणी आपण सर्व या सत्संगाच्या रुपामध्ये उपस्थित आहात. मिळून-मिसळून या परमात्म्याचे निराकार ईश्वराचे गुणगान करीत आहात आणि अवघ्या विश्वाच्या भल्याची कामना करीत आहात. स्वत:साठी देखील हेच मागणं मागत आहेत की, हा जीवनप्रवास मानवतेच्या मार्गावर चालत राहून संपन्न होवो, सद्कर्मांनी युक्त होऊन हा जीवन प्रवास व्हावा. जेव्हापासून इथे या संत समागमाच्या विधिवत तारखा जाहीर झाल्या आहेत तेव्हापासूनच आणि काल व आज दोन्ही दिवशी क्षणोक्षणी, प्रत्येक पैलूचा पुरेपूर आनंद घेतला गेला आहे. आज सकाळीही सेवादलाच्या नवजवानांनी-भगिनींनी रॅलीच्या रुपात सेवेचे महत्व स्पष्ट केले. कर्मातून हे जे उत्तम संदेश दिले जात आहेत अशाप्रकारच्या भावना जगात अभावानेच पहायला मिळतात. त्याच भावना उजेडात आणण्याचा प्रयत्न केला गेला

आहे. इतरांच्या उपयोगी पडण्याच्या भावना महापुरुषांच्या हृदयात असतात. कारण ते अवघ्या विश्वाला आपला परिवार मानतात. स्वत:चा परिवार याचा अर्थ प्रभु-परमात्मा-ईश्वराचा, या निराकाराचा परिवार. तेव्हा अशा परिवाराचे अंग असल्याची जाणीव ठेवून हे सर्वांचे भले मागत आले आहेत. जसे म्हटले आहे-

सबका भला करो भगवान, सबका सब विधि हो कल्याण।

सर्वांचे भले मागितले गेले आहे. केवळ मागणंच मागितलेलं नाही तर भले करण्यासाठी योगदान देखील दिले गेले आहे. याउलट जगामध्ये अहित मागितले जाते, इतरांचे नुकसान व्हावे अशी कामना केली जाते, शाप दिले जातात, इतरांना हरतऱ्हेने दु:खी करण्याचे प्रयत्न केले जातात. म्हणूनच भक्तांचे-संतांचे चलन आणि इतरजनांचे चलन भिन्न-भिन्न मानले जाते जसे-

इनका मार्ग और है, उनका मार्ग और।

ही चेहऱ्या-मोहऱ्याची बाब नाही, वेशभूषेची बाब नाही. भिन्न मार्ग याचा अर्थ ते कदाचित एखाद्या परग्रहावरील रहिवाशी आहेत आणि हे कुठल्या वेगळ्या धरतीवरील निवासी आहेत अशातलाही भाग नाही. एकाच धरतीवर राहणारे आहेत. परंतु त्यांचे मार्ग भिन्न-भिन्न आहेत. याचा अर्थ विचारसरणी वेगळी आहे, दृष्टी वेगळी आहे, भावना वेगळ्या आहेत, कर्मे वेगळी आहेत, चालचलन वेगळे आहे. एक संकुचित आहेत तर दुसरे विशाल आहेत. एकासाठी कोणी परका नाही, कोणी दुजा नाही आणि एक असे आहेत जे आपल्यांनाही परके मानतात. एक असे आहेत जे इतरांना आनंद देऊन आनंदीत होत आहेत आणि दुसरे असे आहेत जे इतरांना दु:ख देण्यात आनंद मानत आहेत. एक असे आहेत जे उध्वस्त करण्यावर विश्वास ठेवतात आणि एक असे आहेत जे आबादी आबाद करण्यावर विश्वास ठेवतात. एक असे आहेत जे प्रेमाच्या गंगेप्रमाणे वाहत राहतात तर एक असे असतात जे रक्ताचे पाट वाहायला लावतात. तेव्हा हे दोन्ही पैलू रात्र आणि दिवसाप्रमाणे वेगवेगळे आहेत.

कालच होळीचा संदर्भ भक्तिसमवेत जोडून गीतं गायली गेली. त्याबरोबरच होळीशी जोडलेल्या त्या पैलूचीही चर्चा झाली. हिरण्यकश्यपु आणि त्याचा पुत्र भक्त प्रल्हाद. एक प्रभात तर दुसरा रात्र. अशाप्रकारे ही केवळ कलियुगाची बाब नाही. हा काळोख आणि प्रभात सतयुगातही होते आणि त्रेतायुगातही होते.

रावणाचे नाव आपल्याला सापडते, कंस, दुर्योधन इत्यादिंची नावेही मिळतात. कलियुगात तर कित्येक उदाहरणे आपल्याला मिळतात. दुसऱ्या बाजुला प्रभातीच्या रुपांचेही वर्णन केले गेले. जसे भक्त प्रल्हादाचा उल्लेख केला की, वयाने लहान आहे परंतु फारच उच्च आहे, श्रेष्ठ आहे. त्याच्या मनात, त्याच्या आत्म्यामध्ये पूर्ण प्रकास आलोकित झाला आहे, तो निर्भेळ भक्तिपथावर चालत आहे. कोणाचे नुकसान व्हावे अशी कल्पनाही त्याच्या मनाला शिवणार नाही. अशाप्रकारे तो ईश्वराची अनन्य भक्ती करीत चालला आहे. अशाचप्रकारे शबरीचेही नाव येते. अशी अनेक उदाहरणे आपल्याला मिळतात, ज्यांनी या परमात्म्याला, निराकार ईश्वराला अंगसंग जाणून, याला हृदयात प्रतिष्ठित करुन स्वत:चे उज्ज्वल रुप बनविले. मानवाला बुध्दी दिलेली आहे. विचार करण्याची, समजून घेण्याची शक्ती दिलेली आहे. आता प्रभात किंवा काळोख यापैकी काय निवडायचे हे त्याने ठरवावे. प्रेमाच्या मार्गावर चालायचे कि द्वेषामध्ये जळायचे आणि जाळायचे आहे, जखम करायची की, मलमाचे रुप धारण करायचे हे त्याने ठरवावे. मानवाला जी विचार करण्याची शक्ती प्रभूने दिलेली आहे त्याचा यथायोग्य वापर करुन हे सिध्द करायचे आहे की, खरोखरच तो एक अशी विवेकबुध्दी बाळगणारा बनलेला आहे. जर अशी सदबुध्दी बनेल तर मग काय सांगावे? म्हणून महापुरुषांना सांगावे लागले-

बिनु सतसंग विवेक न होई। राम कृपा बिनु सुलभ न सोई।

संतांच्या संगतीशिवाय विवेकबुध्दी प्राप्त होत नाही. आपली ही बुध्दी कायम विनाशकारीच बनून राहते. संतांची मती जी श्रेष्ठ मती मानली गेलेली आहे. हीच मती संत इतरेजनांना प्रदान करतात. मग खरोखरच त्यांचे असे सुंदर रुप आकाराला येते. ते धरतीची शोभा वाढविणारे बनतात. ते विनम्र आणि विशाल बनतात, ते मधुर स्वभावाचे असतात.

श्वासांची माळ तर कधीही तुटून जाईल, यासाठी कोणतीही नोटिस दिली जाणार नाही की, सांभाळून रहा. म्हणून मनुष्या तू आतापासूनच सावध हो आणि सत्याच्या मार्गावर चालत असताना आपले ध्येय प्राप्त कर.

गुरु-पीर-पैगंबरांनीही सांगितले आहे की, हे मन विनम्र असावे, दास भावना कायम असावी, आवड असावी. हे तेव्हाच होईल, जेव्हा श्रेष्ठ मत धारण केलेले असेल म्हणजेच संतमत धारण केलेले असेल. अभक्ताची मती श्रेष्ठ असूच शकत नाही. ती मती खोटी असते. ते स्वत:ही बुडतात आणि इतरांनाही डुबवतात. स्वत:ही भटकतात आणि इतरांनाही भटकवतात. मात्र, संत स्वत:लाही सावरतात आणि इतरांनाही सावरतात. तेव्हा यांची मती अंगिकारुन जे मार्गक्रमण करतात त्यांच्यामध्ये कित्येक गुण आविर्भूत होतात. प्रेम, नम्रता, सहनशीलता, सबुरी-समाधान, विशालता अशा समस्त गुण ज्यांचे वर्णन झाले ते त्याच्या जीवनात उतरतात. म्हणूनच त्यांचा दर्जा उंचावत असतो. महापुरुषांनी युगानुयुगे मानवाला हाच संदेश दिला आहे की, हे मानवा तू ही बाब समजून घे, खूप उशीर होण्यापूर्वीच तू स्वत:ला सावर. उशीर होणे म्हणजे तुझा (जीवन) प्रवास संपणे होय. श्वासांची ही मालीका कधी बंद पडेल सांगता येणार नाही. तू स्वत:ला सावर म्हणून पूर्वसूचना दिली जाईल असे काही नाही. तेव्हा हे मानवा ती घडी, तो क्षण केव्हा येणार आहे याचा पत्ता लागत नाही. ती घडी येणार आहे म्हणून हे मानवा, तुला आताच्या आता हा सन्मार्ग स्वीकारावा लागेल. तुला हे जीवनलक्ष्य गाठावे लागेल. महापुरुषांनी म्हटलेही आहे की-

कबीर कालि करंता अबहि करु अब करता सुईकाल।।

अर्थात् उद्या करायचे ते आजच कर आणि आज करायचे ते आत्ताच कर. दुष्कर्मासाठी तर तू उद्याची वाट पाहात नाहीस, दुनियादारीसाठी उद्याची वाट पाहत नाहीस. ते सगळे आताच्या आता करु इच्छितोस. परंतु ज्यायोगे कल्याण साधेल, ज्यामुळे इहलोक-परलोक सावरेल, ज्यामुळे तु सुशोभित होशील, तेच तू उद्यावर ढकलत चालला आहेस. महापुरुष सांगतात की,

बुरे काम कउ ऊठि खलोइआ, नाम की बेला पै पै सोइआ।

दुष्कर्मासाठी उत्सुक आहेत, दुनियादारीसाठी उत्साहित आहेत. धन-दौलतीसाठी चतुराई आणि चालाकी करताना तू काय काय म्हणून करीत नाहीस ? कबीरजींनीही म्हटले आहे-

सांचे का कोई ग्राहक नाहीं झूठे जगत पतीजे जी।

सत्याचे ग्राहक नाहीत. खोट्यावर सगळे फिदा आहेत. खोटा किंवा मिथ्या हा संसार मानलेला आहे. खोट्यासाठी मनुष्य एक एक श्वास मोजतो, अवघे आयुष्य वेचतो. कळायला लागल्यापासून त्याची केवळ आणि केवळ भौतिक विचार, सांसारिक प्रवृत्ती बनून राहते. त्यामुळे त्याची बंधनातून सुटका होत नाही. महापुरुष सांगतात की, सत्याचे ग्राहक बनावे. सत्य प्राप्तीची इच्छा तुझ्या मनात उत्पन्न व्हावी. जसे स्वामी विवेकानंदजींनी देखील म्हटले आहे की, ही (सत्यप्राप्तीची) इच्छा इतकी प्रबळ असावी ज्याप्रमाणे भौतिक गोष्टींच्या प्राप्तीसाठी तुझ्या मनात आस असते. त्याच्याही पुढे जाऊन त्यांनी असे एक दृश्य प्रस्तुत केले की, ज्याप्रमाणे एखाद्या बुडणाऱ्या व्यक्तीला पाण्यातून बाहेर येण्याची इच्छा होते, त्याला त्याचा अंत दिसत असतो, अशा वेळी त्या व्यक्तीची इच्छा कशा स्वरुपाची असेल ? त्याला आणखी कोणतीही इच्छा नसते केवळ आणि केवळ कसेही करुन पाण्याच्या बाहेर यावे आणि माझा बचाव व्हावा, हीच इच्छा असते. बुडण्यापासून तेव्हाच बचाव होईल जेव्हा आपण खरोखर जगावेगळा असलेला आणि ज्याने अवघ्या सृष्टीची रचना केलेली आहे आणि तरीही त्याच्याहून न्यारा आहे अशा (प्रभुचा) बोध प्राप्त करु. जसे अवतारवाणीमध्येही म्हटले आहे-

एह नौं चीजां दृष्टमान ने जिसनूं कहंदे माया ए।
दसवां ब्रह्म एहनां तों न्यारा एहनां विच समाया ए।

हा वेगळा आहे. त्रिगुणरहित आहे (त्रैगुण ते प्रभ भिन्न). हा भिन्न आहे, सर्वव्यापी आहे म्हणूनच कणाकणात विराजमान आहे आणि तरीही निराळा आहे. याच्याशी आपणा संबंध प्रस्थापित करायचा आहे, याचा बोध करुन घ्यायचा आहे. ही जी शाश्वत परमसत्ता आहे तिच्याबद्दलच म्हटले आहे की-

ये जमीं जब न थी, आसमां जब न था।
चांद सूरज न थे, ये जहां जब न था।

जेव्हा काहीच नव्हते तेव्हा देखील हा विद्यमान होता. हे जगत, हे ब्रह्मांड, ही सृष्टी, या सूर्यमाला, या आकाशगंगा (तारामंडळ) हे काहीही नव्हते. केवळ आणि केवळ या परमात्म्याचे अस्तित्व होते आणि ही रचना केल्यानंतरही त्याचे अस्तित्व कायम आहे. महाप्रलयाविषयी आपण बोलतो. उद्या कदाचित महाप्रलय झाला तर ही रचना नष्ट होऊन जाईल परंतु रचनाकार मात्र कायम राहील. एक उदाहरण दास बऱ्याचदा देत असतो की, आपल्या बुध्दीमध्ये एखादा विचार आला आणि तो आपण फळ्यावर खडूने लिहिला. तो फळ्यावर लिहिला याचा अर्थ आता तो बुध्दीमध्ये उरला नाही असा होत नाही. आता कपड्याने त्या फळ्यावर जे लिहिले होते ते पुसले. पण तरीही तो विचार आपल्या डोक्यात कायम आहे. पुसला गेलेला नाही. अशाच प्रकारे हे परमअस्तित्व आहे. हे तर आदिअनादी आहे, कायमदायम अशी परमसत्ता आहे. या सत्तेच्या प्राप्तीची इच्छा मनात बाळगली पाहिजे. आत्म्याला जर आपल्या मूळस्वरुप परमात्म्याची ओळख झाली नाही तर आत्मा जन्ममृत्यूच्या बंधनात अशाप्रकारे जखडून राहील की,

जमि जमि मरै मरै फिरि जंमै।
बहुतु सजाई पइआ देसि लंमै।

मग तो जन्ममृत्यूच्या या चक्रामध्ये अडकून पडेल. जन्ममृत्यूच्या साखळीत जखडला जाईल. म्हणून आत्म्याला स्वस्वरुपाची ओळख व्हावी. आपल्या मुळतत्वाची ओळख करुन घ्यावी यावर महापुरुष जोर देत आहेत. ही अजन्मा असलेली परमसत्ता जगतासारखी नाही, प्रकृतीसारखी नाही. बऱ्याचदा आपण परमात्म्याविषयीच बोलत असतो; पण बोलताना प्रकृतीचा सगळा खेळ आहे असे म्हणत असतो. आपण महत्व प्रकृतीला देतो. परंतु महापुरुष म्हणतात की, जर सृष्टा नसता तर सृष्टी अस्तित्वातच आली नसती. सृष्ट्यामुळे सृष्टी आहे. कलाकार आहे म्हणून कला आहे. चित्रकारामुळे चित्र आहे. जर गळाच नसेल तर कुठले गायन आणि सूर्यच नसेल तर त्याची किरणं कोठून येणार ?

ज्यांनी ज्यांनी आपल्या जीवनात या मूळ सत्तेला प्राधान्य दिले ते मग कबीरजी असोत, रविदासजी असोत, मीराबाई असो, मुक्ताबाई असो, सहजोबाई असो, बौतन्नाजी असोत, वैमन्नाजी असोत, तुकारामजी असोत, नामदेवजी असोत, बुल्लेशाहजी असोत, फरीदजी असोत, मियां बाहू असोत किंवा अन्य कोणीही असोत, त्या सर्वांनी हे नाते जोडले. त्यांनी या सत्याचे दर्शन घेतले आणि मग त्यांनी जाणलं की, खरोखरच या जगाच्या तुलनेत निराकाराचे महत्व अधिक आहे. म्हणून निराकाराला त्यांनी उठता-बसता विशेषता दिली. जसे-

ऊठत बैठत हरि भजहु साधू संगि प्रीति।
नानक दुरमति छुटि गई पारब्रह्म बसै चीति।

तसेच

स्वांस-स्वांस सिमरो गोविंद।

किंवा

तूंहीं तूंहीं निरंकार करो ते पल पल एहनूं याद करो।

मग केवळ काही क्षणांची किंवा घडींची बाब राहिली नाही. श्वासागणिक होऊन गेली. अशाप्रकारे प्रभूची जाणीव, म्हणजेच याला प्राधान्य देत आहेत. याला विशेषता देत आहेत. अन्यथा लोक एखाद्या व्यक्तिच्या बाबतीत उगीचच भ्रमात पडतात की, कदाचित हा प्रभुमध्ये तल्लीन आहे, कदाचित प्रभुचे नाव घेत आहे. कबीरजींनीही स्पष्ट केले आहे-

माला तो कर में फिरे, जीभ फिरे मुख मांहि।
मनवा तो दस दिस फिरै, ये तो सुमिरन नांहि।

हातात माळेचे मनके फिरत आहेत म्हणून याची वृत्ती प्रभूसमवेत जोडलेली आहे असे मानणे. कारण प्रत्येक मनका फिरवताना तो रामाचे नाव घेत असतो, अल्लाचे नाव घेत असतो किंवा रोजरी घेऊन कुठेतरी गॉडमध्ये मग्न दिसतो. कबीरजींनी सांगितले आहे की, गोष्ट मनाची आहे. हाताची, बोटांची किंवा जिव्हेची नव्हे. मनाची बाब आहे. मनच रावण होणार आणि मनच राम होणार आहे. मनानेच बेचैन व्हायचे आहे आणि मनानेच आनंदित व्हायचे आहे. मनामध्ये चांगुलपणा येणार आहे आणि मनामध्येच दुष्ट भाव येणार आहेत. 'मन चंगा, तो कठौती में गंगा।' सारा खेळ मनाचा आहे. तेव्हा हे श्वासोश्वासी नाते जोडणे किंवा 'ऊठत बैठत हर भजो' याचा अर्थ उठता-बसता या प्रभुला प्राधान्य द्यायचे आहे, याची जाणीव ठेवायची आहे, याच्या रंगात रंगून रहायचे आहे.

जे अशाप्रकारची आपली अवस्था बनवतात, ते खरोखरच निर्मळ आणि पावन बनून जातात. त्यांच्या जीवनात आनंदमय अवस्था पहायला मिळते. तेव्हा कुठे जायचे आहे याचा विचार मानवाने केला पाहिजे. ज्या परमात्म्याशी नाते जोडल्याने हे झाड आणि फळे प्राप्त होणार आहेत, ते बीज कोठून मिळवावे ? बीजाशिवाय काहीही होणार नाही. बीज असण्याची गरज आहे. पण मनुष्य मात्र अनेक प्रकारच्या क्रिया करीत चालला आहे. त्यांची अवस्था अशी आहे जमिनीची मशागतही केली आहे, पाणीही पाजले आहे, खतही टाकले आहे आणि त्यातून पीक येण्याची वाट पहात बसला आहे. याच्यातून पीक येईल असे त्याला वाटते. विचारणाऱ्याने जेव्हा विचारले की, भाऊसाहेब पीक तर आले नाही ? तेव्हा उत्तर मिळाले की, नाही आहे. तुम्ही सर्व काही केले का ? हो सर्वकाही केले. मी मशागत केली, भांगलन केली, खत टाकले, पाणी देखील दिले. तेव्हा समोरच्या व्यक्तीने विचारले, बी पेरले का ? तेव्हा म्हणतो, बीज नाही टाकले. मग ती मशागत, ते सिंचन, ते खत काय कामाचे ? मी पठन-पाठन करतो, (तीर्थ) स्थान करतो, तीर्थयात्रा करतो इ. जर या बीजला, या परमात्म्यालाच आपलेसे केले नाही तर इतर गोष्टींचा काय उपयोग ? म्हणूनच महापुरुष-संतजन हे बीज आपल्या ह्रदयामध्ये वसविण्याची प्रेरणा देतात. तेव्हा असे बीज आपल्या मनामध्ये पेरणे आणि मग त्याचे अशा रुपात प्रफुल्लीत होणे, त्याचे रोप बनणे, छायादार वृक्ष बनणे, इतरांसाठी मदतगार बनणे (शक्य होते.). धर्मग्रंथ भरुन राहिले आहेत, वेद-शास्त्र भरुन उरले आहेत, महापुरुषांच्या वाणीने कोणतीही कमतरता ठेवलेली नाही. याची प्राप्ती कोठून व्हावी ? महापुरुषांनी याची प्राप्ती कशी करावी त्याचाही विधी त्याबरोबरच सांगितलेला आहे. मनुष्य समजतो की, जंगलामध्ये जाऊन प्राप्ती होईल. मी जंगलात निघून जातो. याची प्राप्ती होईल. परंतु महापुरुषांनी सांगितले आहे की,

जे रब मितलदा जंगल बेले तां मिलदा गावां वछियां नूं।

जर जंगलांमध्ये जाऊन प्रभुची प्राप्ती होत असती तर कित्येक पशू जंगलामध्येच वास्तव्य करीत आहेत तेव्हा तुझ्या अगोदर त्यांना मुक्ती, तुझ्या अगोदर त्यांचे कल्याण व्हायला हवे. जंगलांमध्ये जाऊन याची प्राप्ती होत असेल तर मग ते फार भाग्यवान आहेत. मग विचारणा केली मी (तीर्थ) स्नान करावे का ? त्यायोगे मला सद्गती मिळेल, तेणेकरुन मला प्रभुप्राप्ती होईल, जीवनलक्ष्य मिळेल. त्याबाबतीतही म्हटले गेले आहे-

जे रब मिलदा नहातेया धोतेया ते मिलदा उड्डुआं मच्छियां नूं।

मग तर तुझ्या अगोदर मासे आणि बेडूक यांचे तुझ्यापेक्षा मोठे भाग्य. मग 'बडे भाग मानुष तन पावा' हे निरर्थक ठरेल. मग तुझ्या अगोदर त्यांचे कल्याण होईल. तू तिथे जाशील, पण ते अगोदरच तिथे आहेत, तिथेच विद्यमान आहेत. अशाचप्रकारे स्मशानात जाऊन मिळेल का ?

जे रब मिलदा मणि मसाणी तां मिलदा चांद झिड़कियां नूं।

महापुरुषांनी कुठे कसर सोडली आहे ? आपण (मनुष्य) आहोत की, डोळे झाकून तिकडेच चाललो आहोत, त्याच क्रिया करीत आहोत. महापुरुषांनी स्पष्ट शब्दांत सांगून टाकले आहे की,

गुर बिन भव निधि तरहि न कोई,
जो विरंचि शंकर सम होई।

तेव्हा महापुरुष-संतजन जे सांगताहेत त्याहून मोठी गोष्ट कोणती असेल ?

आणखी एक प्रश्न आहे तो म्हणजे याच्या प्राप्तीसाठी अगदी निर्मळ व्हायला हवे, त्यांच्याच वाट्याला हा (प्रभू) येतो. आम्ही आहोत कलियुगी जीव. अशा वेळी महापुरुष इतिहासाचा आधार घेऊन सांगतात की, असेच असते तर मग सज्जन ठगाला आयुष्यभर ठग बनूनच रहायला हवे होते. मग तो कसा भक्त बनला ? त्याची तर कर्म चांगली नव्हती. स्वच्छ कोरी पाटी नव्हती, उज्ज्वल कपडे नव्हते (अंगावर), मलीन होता. कौड़ा राक्षसाने कोणती पुण्ये केली होती. तो तर राक्षसी प्रवृत्तीचा होता. भूमिया चोर, गणिका वेश्या पापाचाच भार वाहत होते. मग ते अयोग्य ठरले असते. ते प्रभुची प्राप्ती करुच शकले नसते. महापुरुष हा भ्रम देखील दूर करतात की, जर हे भ्रम तुझ्या मनात असतील तर तेही तू दूर करुन टाक आणि तू आपले पाऊल या दिशेने टाक. जर संतांची संगत मिळाली तर मग जसे ते भगवान श्रीकृष्णांनी सांगितले की, लाखो मण लाकडांचा ढीग असेल आणि एक फुणगी (चिंगारी) आगिची तो भस्मसात करुन टाकते. अशाचप्रकारे जेव्हा या ज्ञानाची फुणगी लागते तेव्हा ती (पापे) कितीही असली तर अशाच प्रकारे नष्ट होऊन जातात.

आणखी एक भ्रम आहे. ईश्वरप्राप्ती एवढी सोपी आहे का ? कित्येक जन्म घ्यावे लागतात, अनेक जन्मांचा हा खेळ आहे. मग अशा मंडळींना प्रश्न केला जातो की आम्ही कबूल करतो आपले म्हणणे. मान्य आहे कित्येक जन्म घ्यावे लागतात. पण कृपा करुन आपण हे सांगाल का की, आपण आतापर्यंत किती जन्म घेतले आहेत ? मग चूप. अहो ! ते तर मला ठाऊक नाही. जर तुला ठाऊकच नसेल तर कित्येक जन्म घ्यावे लागतात हे तत्त्व मानले तरी मग प्रभुप्राप्तीसाठी तुमचा हाच जन्म आहे (असे समजा). तेव्हा कित्येक जन्म घ्यावे लागतात, मोठ्या मुश्किलीने याची प्राप्ती होते, हा भ्रमही महापुरुषांनी दूर केला. महापुरुष उदाहरण देतात की जर कोणी दोन दिवसांचा भुकेलेला असेल तर त्याला दोन दिवसांची भूक शमविण्यासाठी दोन दिवस खातच रहावे लागेल का ? जर एखाद्याने पाच दिवस आंघोळ केली नसेल तर मग त्याला पाच दिवसांचा मळ धुवून टाकण्यासाठी पाच दिवस आंघोळच करीत बसावे लागेल का ? नाही. फक्त पाणी आणि साबण असावा, भोजनाचे ताट समोर असावे, दोन दिवसांची भूक शमेल आणि पाच दिवसांचा मळही धूवून निघेल. महापुरुष-संतजन सातत्याने हे सांगत आले आहेत की, जर शोधायचेच असेल तर ब्रह्मज्ञानीला शोधा-

वस्तु कहीं ढूंढत कहीं किस विधि आवे हाथ।
कहे कबीर तब पाइये जब भेदी लीजे साथ।

वस्तु कुठे आहे आणि तिचा शोध कुठे घेतला जात आहे. जंगलांमध्ये, गुंफांमध्ये कोणी तर सात आसमानांच्या वर मानून बसलेला आहे, अशा समजूती बाळगून शोध घेत आहेत. मग हा प्राप्त कसा होईल ? तेव्हा सांगितले की, जेव्हा भेदी (भेद जाणणारा) भेटेल तेव्हाच प्राप्ती होईल. जेव्हा भेदी मिळाला, ब्रह्मज्ञानीचे सान्निध्य प्राप्त झाले की मग-

दुर्लभ साज सुलभ करी पावा।

दुर्लभ आहे निश्चितच. पण सुलभ झाले, सोपे झाले, कारण भेदी मिळाला. ज्याप्रमाणे एखादा मॅकॅनिक असतो तो म्हणतो की, केवळ एक सेकंद बाजुला व्हा, हा तर माझ्या डाव्या हाताचा खेळ आहे आणि तो ती दुरुस्ती करुन देतो. अशाच प्रकारे ब्रह्मज्ञानी भेटले तेव्हा त्यांनी हे काम सोपे करुन टाकले. महापुरुषांनी अन्य ठिकाणीही म्हटले आहे की, जर डोळ्यांवर मोतीबिंदू आला तर वस्तु जवळ असूनही आपण भटकत राहतो. वस्तु घरातच असते पण आपण कधी इथे तर कधी तिथे शोधत राहतो. तेव्हा अशाप्रकारे ही आपली भटकंती दूर होते आणि ती देखील घरातच, परिवारातच, गृहस्थाश्रमातच. भगवान कृष्णाने अर्जुनाला कुरुक्षेत्राच्या मैदानावरच हा बोध केला. आता जिथे अर्जुनाला हा बोध झाला तिथे तो कोणत्या गुंफेमध्ये होता ? कुठल्या विरान (निर्मनुष्य) जागी बसलेला होता, जिथे त्याला हे ब्रह्मज्ञान दिले ? एक तनावपूर्ण आणि संघर्षमय स्थान युध्दाशिवाय कुठे असू शकेल का ? न जाणो कधी जीवावर बेतणार आहे. कुठे नगारे वाजत आहेत. असे हे स्थान उचित आहे का जिथे ब्रह्मज्ञानाची प्राप्ती व्हावी. परंतु भगवान श्रीकृष्ण त्याठिकाणी अर्जुनाला हे ज्ञान प्रदान करीत आहेत. याचाच अर्थ कर्माच्या क्षेत्रात राहून याचा बोध होणे, गृहस्थाश्रमात राहून, परिवारात राहून ही प्राप्ती होते. कबीरजी गृहस्थी नव्हते

> जेव्हा काहीही नव्हतं तेव्हाही परमात्म्याचं अस्तित्व होतं आणि त्याने ही रचना केली. याचं अस्तित्व आजही आहे आणि जर पुढे महाप्रलय झाला तरीही याचं अस्तित्व राहील. जसं फळ्यावर काहीतरी लिहिलं आणि ते पुसूनही टाकलं तरीही ती गोष्ट डोक्यात कायम स्वरुपी राहते ती डोक्यातून पुसली जात नाही.

का ? ते कष्टाळू नव्हते का ? जबाबदाऱ्या निभावत असताना त्यांना ही प्राप्ती झाली. कारण रामानंदजींच्या रुपात त्यांना ब्रह्मज्ञानी भेटले. मीराबाई राजाच्या घरात जन्माला आली आणि त्यांना ही प्राप्ती रविदासजी ब्रह्मज्ञानी संताच्या कृपेने झाली. तेव्हाच मीराबाईने म्हटले की,

पायो जी मैने राम रतन धन पायो।
वस्तु अमोलक दीनी मेरे सतगुरु कर कृपा अपनायो।

अर्थात मला ब्रह्मज्ञानी सद्गुरु भेटले. तेव्हा मला ही प्राप्ती झाली. अन्यथा अगोदर मी जळत होते-

लकडी जल कोयला भई, कोयला जल भई राख।
मैं अभागन ऐसे जली, कोयला भई न राख।

जेव्हा ब्रह्मज्ञानी रविदासजी भेटले तेव्हा मीराबाईने लक्ष्य गाठले. श्याम (कृष्ण) चे खरे अविनाशी रुप जाणले. अगोदर केवळ श्यामची आकृती जाणत होती, आकर्षण होते, पण अविनाशीला जाणले नव्हते. रविदासजींनी ज्ञानदृष्टी दिली तेव्हा मिराबाईने अविनाशी रुप जाणले आणि धन्य होऊन गेली. गल्लोगल्ली जाऊन डंका वाजवून हाच संदेश देत चालली. सांगण्याचे तात्पर्य आपण सर्वजण समागमामध्ये याच भावनेने आला आहात की, हा संदेश आणखी अधिक लोकांपर्यंत पोहोचावा. हा विचारणीय पैलू आहे. दुर्लक्ष करण्यासारखी बाब नाही. फार गंभीर असा पैलू आहे, वर वर विचार करण्यासारखा नाही. याकडे फारच गंभीरपणे लक्ष द्यायचे आहे. म्हणूनच महापुरुषांनी-संतजनांनी हे संदेश दिले आहेत, याची जाणीव करुन देण्यासाठी, याची आठवण करुन देण्यासाठी. हे फारच महत्वाचे काम आहे आपल्या जीवनातील, जे आम्हाला करायचे आहे. बाकीची कामे आपण करीतच आहोत. पण जे सर्वात आवश्यक करण्यायोग्य काम आहे ते अजून अपूर्ण आहे. तेव्हा हे मानवा! तू हे काम कर. ते उद्यावर टाकू नकोस. सांगण्याचे तात्पर्य संतजन एका बाजूला या दिशेला अग्रेसर करतात याचा केवळ आत्म्याचे कल्याण हाच लाभ नाही तर दुसऱ्या बाजूला इहलोकही सावरायचा आहे. जसे अगोदर म्हटले की, ज्योत या मनामध्ये देखील स्थापित करायची आहे, मन देखील उज्ज्वल बनवायचे आहे.

मनाला प्रेम व करुणेने, दयेने, स्नेहाने सावरायचे आहे. इहलोक सावरण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मनाला सावरने होय. मन सावरले की, ते तनाकडूनही सद्कर्मच करुन घेईल आणि धनाचाही सदुपयोग होईल. जर हे मन चांगले झाले नाही तर मग ते तनाकडूनही दुष्कर्म करवून घेईल, धन देखील दुर्व्यवहारात खर्च करायला लावील. आत्मा आणि मन दोहोंनाही महत्व आहे, इहलोक आणि परलोक सावरण्यासाठी. म्हणूनच वारंवार या मनाला समजावण्यास सांगितले आहे. मनालाच समजावत आहेत की,

मन मेरे भूले कपटु न कीजै।
अंति निबेरा तेरे जीअ पहि लीजै।

मन चंचल आहे. चंचलता हा मनाचा गुण आहे. ते माकडासारखे आहे. माकड कधीही एका जागी थांबत नाही. कधी इकडे उडी मारेल, कधी तिकडे उडी मारेल. कधी या फांदीवर, कधी त्या फांदीवर आणि जरी खांबाला बांधून ठेवले तरी स्थिर राहणार नाही. खांबावरुन वर-खाली होत राहील. हे मन मानत नाही. टिकत नाही. अशाच प्रकारे एक बालक असाच नटखट होता. याच्याशी भांड, त्याचाशी भांड तेव्हा एक युक्ति लढविली गेली. जर तू भांडत-झगडत आहेस तर तुला एक जबाबदारी देत आहोत, करशील ? होय करीन. जा त्या किनाऱ्यावर बसून लाटा मोज. सांगणाऱ्याने विचार केला की, हा लाटा मोजत बसेल आणि त्यामध्ये व्यस्त राहील.

लाट एक येते, दोन-चार येतात (येत राहतात). मग याला भांडणतंटा करायला वेळ मिळणार नाही. तेव्हा तो बसला. त्याला वाटले हे फार सोपे काम आहे. त्याने नुकतेच लाटा मोजायला सुरुवात केली होती तेवढ्यात भयंकर राग आला आणि त्याने दगड उचलला. समोरुन नाव चालली होती त्या नावेच्या दिशेने जोरजोराने दगड मारु लागला. नावेतले लोक म्हणू लागले, का दगड मारतोस, का आम्हाला मारत आहेस ? म्हणाला, मी लाटा मोजत आहे हे दिसत नाही का ? तू इथून नाव चालवलीस आणि सर्व विस्कळीत (disturb) केलेस. आता मला लाटा मोजता येईनात. तात्पर्य अशा हूडमती (मूढमती) व्यक्तीला तिथे घेऊन गेले तरीही त्याने भांडणतंटा सोडला नाही.

मन फार अभिमानी असते, अहंकारी असते. मी-मी करीत असते. महापुरुषांनी सांगितले आहे की, या 'मी'ला काढून टाका आणि तिथे 'तू'ला बसवा. या तू चे गीत गा, मी चा त्याग करा. संतांनीही म्हटले आहे.

मैं-मेरी मत कर, मेरी मूल विनास।
मेरी मन की पैकड़ी, मेरी गल की फास।

यासाठी मनाला विनम्र बनवायचे आहे, मनाला विशाल बनवायचे आहे. हे मन मी-मी करीत असते, स्वत:लाच मनत्व देत असते. स्वत:लाच श्रेष्ठ मानत असते आणि दुसऱ्याला कमी लेखण्यात कोणतीही कसूर करीत नाही. ज्याप्रमाणे एक पती-पत्नी जात होते. पत्नी म्हणाली काय बनला आहात बघितलेत

का ? काय कपडे घातलेत ? (अगदी) मदारी दिसताय बघा. तेव्हा समोरुन पतीने म्हटले, अगदी बरोबर म्हणतेस. मी मदारी दिसत आहे. मदारी कसा दिसणार नाही, माझ्याबरोबर तू माकडीन चालली आहेस ना ? अशाप्रकारे एकमेकाला कमी लेखण्याची दोघांमध्ये अहमहमिका लागली आहे. कोणतीही कसूर करीत नाहीत. जातीच्या कारणावरुनही एकमेकाला कमी लेखले जाते. धर्म-सांप्रदायाचे नाव घ्यावे तर तुझा धर्म खालचा माझा धर्म श्रेष्ठ इ. केवळ मी-मी करीत चालले आहेत. महापुरुष म्हणत आहेत की, ज्याने मी मोठा म्हटले तोच मारला गेला. कारण-

हरजी हंकार न भावई।

आणि आपण अहंकारच करीत चाललो आहोत. रावणानेही हेच केले होते, कंसानेही हेच केले होते, दुर्योधनाने हेच केले होते, हिरण्यकश्यपुनेही हेच केले होते. त्यांच्या वाट्याला काय आले ? त्यांच्या वाट्याला जर काही चांगले आले नसेल तर अहंकार करणाऱ्या तुझ्या वाट्याला काय चांगले येणार आहे ? म्हणून कबीरजींप्रमाणे अशाप्रकारे नम्रता धारण करावी की,

कबीर सभ ते हम बुरे हम तजि भला सभु कोइ।
जिनि ऐसा करि बूझिआ, मीतु हमारा सोइ।

अशाप्रकारे विनम्रता धारण करावी. मनामध्ये सबुरी आणि समाधान धारण करावे. अशी सुबरी आणि समाधान असेल तर मग (इतर) सर्व धन धुलीसमान बनून जाते. या मनाला सबुरी व समाधानाने युक्त बनवावे, विनयशील बनवावे, विशाल आणि सहनशील बनवावे. जर मनाची अशी अवस्था बनली तर मग तुझ्यासारखा सुंदर आणखी कोणीही नाही. मग तुझ्यासमोर उत्तमोत्तम चेहरे देखील कुरुप दिसू लागतील. कारण तिथे चेहरे सुंदर आहेत पण मनामध्ये कुरुपता आहे.

दास आणखी शब्दांचा आधार घेणार नाही. कारण वेळ फार पुढे गेली आहे. शेवटी, पुन्हा एकदा इथे पटनानगरीमध्ये येऊन हा संत समागम करण्याचा योग आला याबद्दल आनंद व्यक्त करतो. मागे दोन वर्षांपूर्वी समस्तीपुर येथे हा योग आला आणि बिहार-झारखंडमध्ये वेळोवेळी कोडरमा, झूमरी तलैया, धनबाद, बरौनी, रांची इत्यादि ठिकाणीही समागमांचे आयोजन झाले. दिल्ली-मुंबई वगळता वेळोवेळी असे प्रादेशिक संत समागम वेगवेगळ्या शहरांमध्ये साकार होतात. मुंबईत महाराष्ट्राचा समागम हा केवळ मुंबईमध्येच होतो आणि दिल्लीचा वार्षिक संत समागम दिल्लीमध्ये होतो. या व्यतिरिक्त जेवढे म्हणून प्रादेशिक संत समागम आहेत त्यांची शहरे, ठिकाणे बदलत राहतात. अशा तऱ्हेने यावेळी पटनाचा क्रम आला. इथे बिहार-झारखंडच्या प्रादेशिक संत समागमाचे आयोजन झाले ज्यामध्ये कितीतरी मोठ-मोठी योगदाने दिली गेली, ती आताच आपण प्रबंधक महापुरुषांकडून श्रवण केली आणि आपण संतसंगतीनेही भरपूर उत्साह दर्शविला आहे, परिणामस्वरुप सगळे अंदाज कमी पडले, आपला उत्साह श्रेष्ठ ठरला.

अगदी पहिल्या दिवसापासून दास जेव्हा मैदानात पोहोचला तेव्हा हेच पहायला मिळत होते की, सायंकाळपर्यंत देखील मुले असोत किंवा ज्येष्ठ असोत सगळे आपापल्या डोक्यांवर सामान घेऊन रस्त्यांवरुन या मैदानाच्या दिशेने चालत येताना दिसत होते आणि सकाळी आलो तेव्हा तर त्यापेक्षाही अधिक भक्तगण दिसून आले. रस्त्यांवरुन मैदानाकडे येताना. शोभायात्रा चालू होती तेव्हाही संगती या दिशेने येत होत्या आणि काल रात्री जेव्हा इथून जाणे झाले तेव्हाही तोच प्रवाह (लोंढा) चालू होता. सांगण्याचे तात्पर्य समस्त साधसंगतमध्ये असा उत्साह आहे. कारण आपल्याला आवड लागली आहे, भक्तिने ओतप्रोत असे आपले भाव आहेत, प्रेमाचा आणि उपकाराचा भाव आहे. संत असतातच उपकारी. अशा समागमांमध्ये जिथे आपण आपली भक्ती निभावत असता, भक्तीला आणखी उजाळा देत असता तिथे यानिमित्ताने उपकार देखील घडून जातात. हा संदेश आणखी पसरविण्यासाठी आपले योगदान होत असते.

दातारने सर्वांवर कृपा करावी. अशाचप्रकारे सर्वांवर हा भक्तीचा रंग, प्रेमाचा, नामाचा रंग चढलेला असावा आणि अशाच प्रकारे हे उपकार या जगावर यांनी करीत जावे, हीच शुभकामना, हीच प्रार्थना आहे. या प्रार्थनेबरोबरच दास आपली आज्ञा घेऊ इच्छितो.

संतजनहो, धन निरंकार जी।

प्रस्तुति - **सविता चौधरी**

मराठी रुपांतर - **स. वि. लव्हटे**

मातृवचनामृत

संतजनहो, आपण मिळूनमिसळून भक्ती करावी अशी शिकवण आपल्याला सद्गुरुने दिली आहे. जस-जशी आपण भक्ती करतो, मनाला समाधान आणि सुख मिळत राहतं. आपण हे तर जाणताच की, जगात मनुष्य अनेक दुःखाने वेढलेला आहे, परंतु अशावेळी महापुरुष गुरुच्या आदेशानुसार आलेली वेळ निभावून नेतात. ते मानतात की,

सुखु दुखु दुइ दरि कपड़े पहिरहि जाइ मनुख।

ज्याप्रमाणे आपले कपडे जेव्हा मलीन होतात, तेव्हा धुतलेले कपडे आपण परिधान करतो. याप्रमाणेच महापुरुष सुख-दुःखाला दातार प्रभूने दिलेलं दान मानून पूर्ण सहनशीलतेने निभावून नेतात.

संतजनहो, दातार प्रभुच्या चरणी हीच प्रार्थना करुया की, आम्हाला एकमेकांची कदर करता यावी. एकमेकांचे मानून चालण्याची भावना मनात प्रगट व्हावी. भलेही ते आमच्या घरातील सभासद असोत आणि भलेही सद्गुरुने बनविलेला आमचा हा परिवार असो, कोणी कुठेही वास्तव्य करणारा असो आणि कोणी कुठेही राहणारा असो. आपण जेव्हा भक्तीचा आनंद घेतो तेव्हा जीवनाचा प्रत्येक पैलू सुखमय होतो. ज्यावेळी आपण भक्तीला प्राधान्य देतो त्यावेळी मन आनंदित राहतं आणि प्रत्येक वेळी हीच प्रार्थना निघते की, दातार प्रभू कृपा कर. आम्हाला अशाप्रकारे सेवा, नामस्मरण आणि सत्संगाशी जोडून ठेव जेणेकरुन जगातील जितके चढ-उतार आहेत, ते अशाप्रकारे निघून जावेत की त्यांचा कोणताही परिणाम होऊ नये. जर आम्ही सत्संगाशी जोडून राहिलो, तर या वस्तुंच्या प्रभावापासून दूरच राहू.

संतजनहो, सद्गुरु तर प्रत्येक वेळी आमच्या मस्तकावर हात ठेवतो जेणेकरुन आमचा प्रत्येक क्षण सुखमय व्हावा. जगात ते सुख कुठेही मिळत नाही. तो आनंद कुठेही मिळत नाही जे आम्हाला सद्गुरुच्या चरणी प्राप्त झाले आहे. आपण आपल्या अंतरंगात डोकावून पाहूया की, सुरुवातीला आमचं जीवन कसं होतं आणि आता जीवनात किती परिवर्तन झालं आहे. तेव्हा आपल्याला समजेल की, सद्गुरुच्या शिकवणींनी आमच्यात किती परिवर्तन केलं आहे. जग तर आमच्याकडे डोळे लावून बसलं आहे. ते जस-जसे आमच्या जीवनातील उन्नती पाहतात त्यावेळी नजीक येऊन विचारतात की, बंधू! तुम्हाला अशी कोणती भक्ती मिळाली आहे, ज्याच्या आनंदात, सुखात तुम्ही राहात आहात. तेव्हा म्हणावं लागतं की, सद्गुरुच्या चरणी गेल्याने हा आनंद, सुख आम्हाला प्राप्त झाले आहे. साधसंगतशिवाय कुठेही असं सुख मिळत नाही, वाटल्यास मग कितीही जगातील पदार्थ असोत. साधसंगतपासून आपण दूर होऊन पाहूया, मनात काळोख साचून बेचैनी निर्माण होईल. जर सत्संगात नित्यप्रति आल्यास जितक्या वस्तू आहेत त्या आपल्यापासून दूर राहतील. म्हणून प्रार्थना करुया की, दातार! अशा सज्जनांची भेट व्हावी, ज्यांना भेटून आपले नाव मुखात यावे आणि गुरुदरबाराशी आम्ही जोडून रहावे.

संतजनहो, भक्ताचं रंग रुप पाहिलं जात नाही, फक्त भावनाच पाहिली जाते. भावना अशी की ज्यात जगाच्या भल्याचीच इच्छा असेल. कोणत्याही एखाद्या जातीसाठी नाही, वर्णासाठी नाही, लहान-मोठ्यासाठी नाही, कोणत्याही संप्रदायासाठी नाही, कोणत्याही विद्वान किंवा

अशिक्षितासाठी नाही, गरीब किंवा श्रीमंतासाठी नाही, हिंदू-शीख-ख्रिश्चनांसाठी नाही; तर फक्त मानवाच्या भल्याचीच इच्छा केली जाते. भलेही महात्मा कोणत्याही युगात आलेले असोत त्यांनी मानवाला वारंवार हाच इशारा दिला आहे की, हे मानवा! तुला या जगात पाठवले होते ते या प्रभू परमात्म्याची प्राप्ती करण्यासाठी, परंतु इथे येऊन तू आपल्या कामामध्ये गुंतून राहिलास. म्हणून तुझ्यासाठी म्हटले आहे की,

उठ फरीदा सुतेया, दुनिया भालन जा।
मत कोई थीवे बख्शया, तू भी बख्शया जा।

काम तर आपल्याला हेच करायचं आहे, परंतु न जाणो आपण कोणत्या गोष्टीत अडकून पडलो. आपल्याला सद्गुरुला भेटून निराकार प्रभूला जाणायचे आहे.

संतजनहो, गुरु आणि निराकार एकच असतो. आपल्याला समजावण्यासाठी हा शरीर धारण करतो, शरीरात प्रवेश करतो. जसं आपण जगात पाहतो की, डॉक्टरही शरीरानेच असतो आणि रुग्णही शरीरानेच असतो. वस्तादही शरीरानेच असतो आणि चेलाही शरीरानेच असतो. ज्याला आपण काही देतो तो सुध्दा शरीररुपाने असतो आणि ज्याच्याकडून काही तरी घेतो तो सुध्दा शरीररुपाने असतो. म्हणून प्रभूसुध्दा शरीर धारण करुनच येतो, परंतु जेव्हा जगात (प्रभू) येतात तेव्हा आपण यांना चर्म दृष्टीने पाहतो त्यामुळे खरी ओळख होऊ शकत नाही. या डोळ्यांकडून (चर्म दृष्टी) मनुष्य स्वतःचीही ओळख करु शकत नाही जोपर्यंत त्याला दुसरा कोणी दाखवू शकत नाही, मग प्रभू परमात्म्याची ओळख आपणहून स्वतः कशी होईल? याला तर आपण सद्गुरु कृपेनेच जाणू शकतो आणि आपले जीवन सफल करु शकतो.

- निरंकारी राजमाता कुलवंत कौरजी

निरंकारी राजमाताजींचे प्रवचनांश

★ फुलाचं सौंदर्य, सुगंध आणि कोमलता काट्यांमध्ये राहूनही कायम असते. त्याच्या गुणांवर कोणताही परिणाम होत नाही. अशाच प्रकारे भक्त देखील आपल्या दैवी गुणांचा त्याग करीत नाही.

★ एखादा कपडा कितीही मळलेला असला तरी अशा कपड्याला धोबी धुतो, धुण्यासाठी धोबी नाकारीत नाही. अशाच तऱ्हेने माणूस कितीही चुकलेला का असेना, सद्गुरु त्याच्या मनावर चढलेला मळ धुऊन काढतो.

★ ज्याप्रमाणे वृक्ष आपल्या सावलीचा लाभ घेत नाही, शीतलता घेत नाही, आपली फळंही स्वतः खात नाही. याप्रमाणेच वास्तविक जीवन तेच आहे जे दुसऱ्यांसाठी असतं.

★ आपण कारभार, नातेवाईक, विवाह इत्यादी गोष्टी सकाळपासून संध्याकाळपर्यंत करतच असतो. त्यामुळे त्रासही उद्भवतो. परंतु चोवीस तास जरी प्रभू चर्चा करत राहिलो तरी सर्वांना आनंदच मिळतो त्रास होत नाही. चेहरा सदैव खुललेला राहतो.

★ महापुरुष सदैव सकारात्मकच विचार करतात. जर कोणी म्हणाला की, 'मांजर आडवी गेली' तर गुरुभक्त म्हणतो, 'मांजरीने मार्ग सुलभ केला.'

★ आगीत आग टाकल्याने आग आणखीनच वाढते. आगीला शांत करण्यासाठी पाणीच पाहिजे. याप्रमाणेच क्रोधाला नम्रतेने शांत केले जाऊ शकते.

★ ज्या प्रमाणे चोरी करताना चोर अंधाराबद्दल जागरुक असतो. तो तोपर्यंत वाट पाहतो जोपर्यंत अंधार पडत नाही. याप्रमाणेच काम, क्रोध, लोभ, मोह, अहंकार हे चोर देखील अज्ञानरुपी अंधारात माणसावर परिणाम घडवून आणतात.

'विवेक' विचारधारेचा अनमोल खजिना

संतजनांनो धन निरंकारजी!

संतजनांनो! आज आपण सर्वजण उपस्थित आहोत. आपल्यात जरी समानता नाही तरी कमीत कमी एक समानता तर आहे की, आम्ही मनुष्य आहोत. माणसातील गुणदोष तर आमच्यासोबत जोडले आहेत. माणसाची ज्ञानेंद्रिये आमच्या सोबत आहेत, ज्यांचा उपयोग आम्ही शक्तीनुसार करतो. जसं परमात्म्याने आम्हाला कान, नाक, जिभ दिली आहे. डोळे हे जणू एक मशीन असून त्याची रवानगी मेंदूपर्यंत केलेली आहे. डोळ्यांनी आम्ही पाहण्याचे काम करतो. कानाने आपण भजन ऐकतो, गीतं ऐकतो आणि शिव्याही ऐकतो. ठीक याचप्रमाणे नाकाचे काम आहे... श्वास घेणे. यांच्या कर्मानुसार बुध्दीला माहिती मिळाली. त्यांचे कार्य संपन्न झाले. बुध्दीने आपला अनुभव कामी आणला की, वाईट बोलत आहेस. बुध्दीने सांगितले, निर्णय करणे ज्ञानाचे काम आहे. खऱ्या-खोट्याचा निर्णय ज्ञानच करु शकतं. यानंतरची अवस्था सद्गुरुनं सांगितली, इथंच समाप्ती झाली नाही. यानंतर परमार्थाची गोष्ट येते. हे चुकीचं झालं, जर माझं मन प्रभूशी, आध्यात्मिकतेशी जोडलेलं असेल तर माझं कर्मच बदलून जाईल. कोणाला बदनाम करु, हा माझा स्वार्थ आहे. जेव्हा गुरुची जाणकारी होते तेव्हा समजू लागतं. ज्याचा मी अपमान करतोय तो तर माझा आहे. ही एक जाणीव झाल्याने आपलं कर्मच बदलून जातं.

गम बढकर आते है कातिल की निगाहों की
मुझे ये दोस्त छुपा ले तू गुनाहों की तरह

आपल्या गुन्ह्यांचे पडदे तर मी झाकून टाकतो. गुन्हे तर माझ्यातही असतात, परंतु त्यांना मी सुंदरतेने लपवितो.

एक भारतीय युरोपमध्ये उभा आहे आणि कोणाला तरी मदत करत आहे. म्हणत आहे की, हा माझा भारतीय आहे, याची मला मदत करायला पाहिजे. विशालतेशी नातं तुटलं. युरोपातून भारतापर्यंत आला. Narrow (सीमित) झाला. नंतर तो म्हणतो, हा तर माझ्या मुंबईचा आहे. आणखी कमी झाला. अरे, हा तर माझ्या अंधेरीचा आहे आणि आणखीनच लहान झाला. अरे हा तर माझ्या गल्ली-बोळातील आहे. अरे हा तर माझ्या इमारतीमधला आहे. आणखीनच लहान झाला. अरे, हा तर माझ्या घरातील आहे. घरापर्यंत मर्यादित झाला. माझा शब्द तोच आहे, परंतु आकार कमी झाला आहे. माझं माझ्यापर्यंत मर्यादित राहिले. बाबाजींनी परमात्म्याशी भेट घडवून आणली. विशालतेशी (परमात्म्याशी) जोडलो नाही. माझी शंका लहान होत जाते. हा मी आहे आणि हा माझा आहे. प्रभूने आपलं विधान बदललं. सर्व जगाला आपलं समज. तुझा मी आणि माझ्याची कक्षा वाढत जाईल. उदाहरणार्थ एक शेठजी आहेत. ते फारच कृपण (कंजूष) आहेत. रस्त्यावरुन चालताना ते एका खड्ड्यात पडले. त्याच रस्त्याने एक सज्जन जात होते. त्या सज्जनाने शेठजींना खड्ड्यात पडलेलं पाहिलं. सज्जन त्या शेठजींना म्हणाले, लालाजी, तुमचा हात द्या पाहू. त्यावेळी ते शेठजी म्हणाले, मी का म्हणून हात देऊ ? हा हात माझा आहे. ते सज्जन एक गुरसिख होते. त्या गुरसिख सज्जनाने म्हटले, लालाजी हा माझा हात घ्या आणि पकडा पाहू. शेठजी म्हणाले, होय द्या पाहू. गुरसिख हे माणसांचा स्वभाव जाणून असतात. म्हणून ते आपले परोपकाराचे काम सोडत नाहीत. याचप्रमाणे सद्गुरुने आम्हाला एका सूत्रात बांधले आहे. सर्व घटाघटात मी आहे आणि सर्वांमध्ये मी आहे.

संतजनहो, जाणीव (feeling) आपल्या शब्दांशी जोडलेली असते. एक सावकार पैसे कमविण्यासाठी घराबाहेर पडले. परदेशात गेले. आठ-दहा वर्षे निघून गेली. आपल्या बायको-मुलांना सोडून पैसे कमविण्यासाठी ते येथे (परदेशात) आलेले आहेत. शेठजींच्या मनात आले की, पुष्कळच पैसे कमविले. आता बायको-मुलांना भेटावे. ते आपल्या गावाकडे निघाले. त्यांचा मुलगा वडिलांना

घ्यायला जातो. आपल्या जुन्या नोकराला घेऊन तो मुलगा वडिलांच्या शोधार्थ निघाला. अचानक त्या मुलाच्या पोटात दुखू लागले. म्हणून वाटेत एका हॉटेलात ते दोघे थांबले. रात्र फारच झाली होती म्हणून शेठजीसुध्दा त्याच हॉटेलमध्ये थांबले. त्या मुलाच्या पोटात फारच दुखत होते, तो रडत होता, आरडाओरड करत होता. शेठजीने पहारेकऱ्याला बोलावले आणि विचारले, "तो मुलगा का रडत आहे? त्या मुलाला डॉक्टरकडे घेऊन जा, एखादे औषध द्या आणि त्याला गप्प करा. मला झोपू द्या. पैसे जास्त घ्या, परंतु त्या मुलाला गप्प करा पाहू किंवा त्या मुलाला हे हॉटेल सोडून जायला सांगा. मला झोपू द्या". तो आपल्या निर्णयाशी कायम होता. कारण तो मुलगा त्याचा आहे हे त्याला माहीत नव्हते. सकाळी उठून शेठजी आपल्या जुन्या नोकराला त्याच हॉटेलमध्ये पाहतात आणि ते खूश होतात. त्याच्याजवळ आपल्या परिवाराबद्दल चौकशी करतात. रात्री घडलेली सर्व घटना नोकर त्या शेटजीला सांगतो. आणि शेटजीमुळे संपूर्ण रात्र आम्हाला बाहेर काढावा लागली. जो मुलगा रडत आहे तो आपलाच मुलगा आहे. हे समजल्यावर शेठजींना फारच दुःख होतं. वाईट वाटतं आणि पश्चातापही होतो. संतजनांनो, रात्री त्या वेदना का झाल्या नाहीत? आता का होत आहेत. रात्री पश्चाताप झाला नाही, आता का होत आहे? त्याला माझा समजेल तेव्हा आयुष्याचा विचार करण्याचा अंदाज समजून येईल. एक सूत्र समजून येईल, जाणीव समजून येईल. मनुष्य प्रभूसारखा होतो. घटा-घटात, पाना-पानात, माझ्यात-तुझ्यात हा प्रभू परमात्मा आहे ही जाणीव होइल तेव्हा आपला व्यवहार बदलून जाईल. येथे प्रभू परमात्म्याबद्दल गोष्ट होतेय आणि विचार मात्र संसाराबद्दल करतोय. सत्संगात मी आहे आणि विचार मात्र व्यवसायाबद्दल (Business) करतोय, जर विचार एक असतील तर आपले जीवनच बदलून जाईल. मनुष्य एका बाजूला होतो.

एका माणसाने विचारले, तुझ्यामागे सिंह लागला तर तू काय करशील? तो मनुष्य म्हणाला, मी पळून जाईन. जर सिंह तुझ्यामागे आला, तर तू काय करशील? तर मी झाडावर चढेन. जर तो झाडावर चढला, तर तू काय करशील? तेव्हा तो मनुष्य म्हणाला, पहिल्यांदा मला हे सांग की, तू सिंहाच्या बाजूने आहेस किंवा माझ्या बाजूने आहेस. याप्रमाणेच संतजनांनो, मी जगाच्या बाजूने आहे की सद्गुरुच्या बाजूने जो सद्गुरुच्या विचारात आपले विचार मिसळतो त्यावेळी सर्वकाही प्राप्त करतो.

माया मिली ना राम

दास नेहमीच आपल्याला ही गोष्ट सांगत असतो. दिल्लीची एक भगिनी होती. ती प्रत्येक दिवशी सकाळी सात ते आठ वाजता सत्संगाला जात असे. त्या दिवशी त्या भगिनीच्या घरी पाहुणे आले होते. ती सकाळी लवकर उठून लवकरात लवकर आपली कामं आटपत होती. जेव्हा तिने सत्संगाची वेळ निघून जात असल्याचं पाहिलं तेव्हा तिचं मन चलबिचल होऊ लागलं. घड्याळात पाहिले तर सात वाजून पंचविस मिनिटे झाली होती. त्या भगिनीचे पूर्ण ध्यान सत्संगाकडे लागलेलं होतं. ती आपल्या मनात विचार करु लागली की, जर आज सत्संगात सात वाजून पंचविस मिनिटांनी विचार सुरु झाले तर मी सत्संगात पोहचेन. त्या भगिनीने डाळीत थोडं पाणी वाढवलं, गॅस मंद (slow) ठेवला आणि सत्संगाकडे ती जाऊ लागली. सत्संगात जाताच तिने पाहिले की, आठ वाजले आहेत पण स्टेजचे महात्मा आपले विचार संपवतही नाहीत. तिचं ध्यान घरातील डाळीकडे लागलं. आता मात्र आठ वाजून पाच मिनिटे झाली, तरीही विचार अजून चालूच आहेत. डाळ जळली तर नसेल ना? डाळीतील पाणी आटले असेल का? काही Problem (समस्या) उभा राहिला नसेल ना? जेव्हा घरात होती तेव्हा तिचं ध्यान सत्संगाकडे लागलेलं होतं आणि आता सत्संगात असूनही तिचं ध्यान घराकडे लागलं होतं. द्विधा मनस्थितीत सापडली होती. सत्संग करणे म्हणजे वर्तमानात जगा इतकंच आहे. आपला प्रयत्न करा आणि त्यानंतर समर्पित व्हा. जे झालं ते चांगलं झालं. त्यावेळी आपण शांत राहतो. जर तुमचं ध्यान सत्संगाकडे असेल, तर सत्संग करा. गुरुची मर्जी काय असेल ते कसं सांगणार. कदाचित आपली डाळ शिजल्यानंतर गॅसच संपला आणि डाळ चांगल्या तऱ्हेने शिजली असेल. एका बाजूने राहा. संतजनांनो, कोणास ठाऊक माझं भलं त्याच्यातच असेल. त्याचे आभार व्यक्त करा. असं का झालं, कशासाठी झालं अशा द्विधा अवस्थेत पडायचं नाही.

क्रमशः ...

सौ. सरीता नयन तळवडेकर
(कुर्ला, मुंबई)

अनुभवाचे बोल

या! आभार मानूया ...

वडिलांनी आपल्या लहान मुलाला म्हटले, "चल चिंटू, एका पायावर उभा रहा." चिंटू एका पायावर उभा राहिला. एक मिनिट झाला दोन मिनिटे झाली. चिंटू म्हणाला, बाबा! पायाला खूप त्रास होतोय. वडील म्हणाले, "आता अशाच प्रकारे चालून या व्हरांड्यात चक्कर मारुन ये. दुसरा पाय खाली ठेवायचा नाही." व्हरांडा फारच मोठा होता. चिंटू मोठ्या मुश्किलीने चक्कर मारुन आला. त्याचा पाय खरोखरच दुखत होता.

वडील म्हणाले, "चिंटू! दुसरा पाय खाली ठेव आणि दोन्ही पायावर उभा रहा". ठीक आहे. हे सांग, एका पायावर उभं राहताना आणि चालताना काय वाटलं?" चिंटू म्हणाला, "बाबा! एका पायावर इतका वेळ उभे राहणे फारच अवघड होते आणि चालणे तर अधिकच अवघड होते. पाय फारच दुखत आहे." वडील म्हणाले, "पाहिलस! दोन पाय देऊन प्रभूने किती कृपा केली आहे ही गोष्ट आता ध्यानात आली आहे. देवाने जर एकच पाय दिला असता तर आपल्याला उभे राहण्यात आणि चालण्यात किती त्रास झाला असता बरं!"

याबाबत सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज सांगतात, "आभाराचे भाव आपल्या मनात असायला हवेत. आमचं ध्यान सदैव त्या वस्तुंवर केंद्रित असतं, जे आमच्याजवळ नसतं. ज्या आमच्या जवळ आहेत त्याकडे आमचं ध्यान जातच नाही. हे प्रभू! तू आम्हाला खूप काही दिलेलं आहे. जेव्हा मी माझ्या चोहिकडे पाहतो तेव्हा असं दृष्टीस पडतं की, कितीतरी लोक असे आहेत ज्यांच्याजवळ ते सर्व नाही जे माझ्याकडे आहे. हे परमेश्वरा, दास आपला आभारी आहे. ही असते आभाराची भावना!"

वाटल्यास वेळ कोणतीही असो. आम्हा सर्वांच्या जीवनात पुष्कळ असं काही होतं की ज्यासाठी आपण प्रभू परमात्म्याचे आभार प्रगट करतो. आपण जिवंत आहोत हेच सर्वात मोठे आभार आहेत. आमचे श्वास येत-जात

आहेत. हजारो-लाखो माणसं अशी होती की जी आमच्या वयापर्यंत पोचण्यापूर्वीच शरीर सोडून गेली.

जेव्हापासून आपण जन्माला आलो आहोत, तेव्हापासून प्राणवायू घेत आहोत. प्रभूने याचा आजतागायत एकही पैसा मागितला नाही. किती कृपा आहे ही. हाच प्राणवायू गॅस सिलिंडरमध्ये भरुन रुग्णालयात रुग्णांना पैसे घेऊन विकला जातोय. परमात्म्याने जर आमच्याकडे आतापर्यंतच्या प्राणवायूचा हिशेब मागायला सुरुवात केली तर काय होइल?

जे मनुष्य शरीर आपल्याला परमेश्वराने दिले आहे, ते किती अनमोल आहे. हे सांगा की, आपण एक करोड रुपयाला आपले दोन्ही डोळे विकू शकाल का? आपण आपल्या दोन्ही पायांऐवजी काय घेऊ शकाल? आपल्या दोन्ही हातांच्या बदल्यात? आपल्या बोलण्याच्या शक्तीच्या बदल्यात? परंतु मनुष्याला याचं महत्त्व समजत नाही. मानव देह कोट्यावधी दौलतीपेक्षा श्रेष्ठ आहे. जर पॅथॉलॉजीच्या पुस्तकांवर दृष्टी टाकली, तर हजारो रोग असे आहेत ज्यांची नावं आजतागायत आपण आणि मी सुध्दा कधीही ऐकली नसतील. आपल्याला निराकार प्रभूचे आभार मानायला हवेत की, यापैकी कोणत्याही आजाराने

आपण पीडित नाही.

आपण पाहू शकता? आपण म्हणाल होय, तर आपण जगातील त्या लाखो लोकांपेक्षा सर्वोत्कृष्ट आहात जे पाहू शकत नाहीत. आपण हा लेख वाचू शकता? आपण म्हणाल होय. तर आपण त्या करोडो लोकांपेक्षा उत्कृष्ट आहात, ज्यांना डोळे असूनही ते अशिक्षित आहेत. या, आभार मानूया, आपण आणि आम्ही बोलू शकतो. जे जन्मापासूनच बोलण्यास असमर्थ आहेत त्यांचं काय? आमचे दोन्ही हात आणि पाय योग्य पध्दतीने काम करत आहेत. ज्यांनी संपूर्ण आयुष्य एक हात, एका पायाने काम केले आणि अजूनही करत आहेत त्यांचं काय? आपल्या आणि माझ्या शिरावर परमेश्वराने छप्पर घातले आहे, जे आपले संपूर्ण आयुष्य फुटपाथवर घालवतात त्यांचे काय? आपण आणि मी त्यांच्यापेक्षा लाखपटीने चांगले जीवन व्यतीत करत आहोत.

आपणास भूक लागते ना? मलाही लागते. आपण आणि मी दोघेही भाग्यवंत आहोत. न जाणो असे कितीतरी लखपती मनुष्य आहेत ज्यांना भूक वाढविण्याच्या गोळ्या खाऊनही भूक लागत नाही.

मी काल जेवलो होतो, आपणही काहीतरी खाल्ले असेलच. या! या गोष्टीचे आभार मानूया. न जाणो कित्येकांच्या नशिबी दोन वेळचं जेवणही नसतं. मी आजही भरपूर जेवलो होतो. जर आपल्याला माझ्या सारखं रोजच भरपूर जेवायला मिळत असेल, तर या गोष्टीचे देखील आभार मानूया. या जगात लाखो अशी माणसं आहेत ज्यांना पोटभर खायला मिळत नाही. नेहमीच मुलं आरडाओरड करतात की, त्यांच्या जवळ परिधान करण्यासाठी आधुनिक फॅशनचे कपडे नाहीत. त्यांनी आभार मानायला हवेत की, त्यांच्याजवळ कपडे तरी आहेत. जर ते आफ्रिकेच्या जंगलात जन्मले असते तर, त्यांच्या नशिबी हे सुध्दा मिळाले नसते.

बाबा गुरबचनसिंहजी म्हणत, "निराकार दातारकडे कोणत्याही प्रकारची तक्रार करता कामा नये, कारण पायात चप्पल नाही तर काय झालं, पाय तर आहेत. जर हे सुध्दा नसतं, तर आम्ही काय केलं असतं. प्रत्येक अवस्थेत आभारी असायला पाहिजे, त्याच्या इच्छेनुसार राहायला पाहिजे. प्रभू इच्छेला शुभ मानून चालायला हवे, कारण निराकार संतोषी भक्तांवर कृपा करणारा असतो. याची कृपा याच्या मर्जीत राहण्यावरच असते."

सर्वात मोठे आभार हे आहेत की, सद्गुरुने आम्हाला ब्रह्मज्ञान प्रदान करुन आमचं नातं या निराकार प्रभूशी जोडले आहे. सत्संग, सेवा, नामस्मरण करण्याची शुभ संधी आम्हाला प्रदान केली आहे. साकार सद्गुरुचं दर्शन प्रत्येकाच्या नशिबी कुठे असतं? आमचा जन्म अशा वेळी झाला आहे, जेव्हा सहजपणे भक्ती करायला मिळत आहे. जगातील लाखो-करोडो लोक यापासून वंचित आहेत. आमच्या शेजारी-पाजारी हजारो लोक असे आहेत जे अंधारात जीवन व्यतीत करत आहेत.

जीवन प्रवासात ऋतू बदलतच राहतात. तक्रारींची हजारो कारणं विनासायासही मिळतात, परंतु प्रत्येक अवस्थेत आभार व्यक्त करणे फक्त गुरसिखच करु शकतात. हीच विनंती आहे की, आभार व्यक्त करण्याची भावना सदैव मनात असावी. संपूर्ण अवतारवाणीत म्हटलं आहे की,

मानी तू आभार प्रभूचे, दुःख असो वा सुख महान।
घडी आज ही आनंदाची, येईल तीही सुखाची जाण।

(अ.वा. पद संख्या ९९)

- विकास अरोरा
(रेवाडी, हरियाणा)
vikas.writer@gmail.com

दिव्यत्वाची जेथे प्रचिती ...

बाबा गुरबचनसिंहजींच्या जीवनाचे विविध पैलू

सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराजांचे जीवन म्हणजे एक प्रवासच होता. डिसेंबर १९६२ साली या जीवन प्रवासाला सुरुवात झाली. शहनशाह बाबा अवतासिंहजीं महाराजांनी या सत्य प्रचाराची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर सोपविली तेव्हापासून त्यांनी मानव कल्याणासाठी दिवस-रात्र एक केली. दूर-दूरचे प्रचार दौरे करणे त्यासाठी रात्री प्रवास करायचा आणि दिवसा संतजनांना आशीर्वाद रुपी वचनांनी आनंदित करायचे हे कार्य त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनले होते. ज्या वाहनामध्ये बसून प्रचार दौरा करत असत, एकवेळ ती वाहनं विश्रांतिसाठी कारखान्यात एक-दोन दिवस थांबतही असतील, परंतु युगप्रवर्तक सद्गुरु बाबाजींनी आपल्या शरीररुपी वाहनाला मात्र कदापिही विश्रांती दिली नाही. त्यांच्या अंत:करणात विश्वकल्याणाच्या भावनेची ज्योत इतकी काही प्रज्वलीत झाली होती की, या सत्याचा आवाज प्रत्येक मनुष्यजीवापर्यंत पोचविण्याचा त्यांच्या सदैव प्रयत्न असे. हा ध्यास त्यांना कधीही एका ठिकाणी स्वस्थ बसू देत नसे. मोसम कोणताही असो, अडचणी-अडथळे आणि संकटं कोणत्याही प्रकारे येवोत, परंतु त्यांच्या अटळ निर्धारापुढे सर्वांना झुकावेच लागत असे.

मानवी भावनांना ठेच लागेल असे कधीही करु नये. लहान-मोठा, गरीब-श्रीमंत किंवा आणखी कोणताही भेदभाव न करता प्रत्येक संतांनी दिलेल्या प्रेम, सेवा, सत्काराची परतफेड त्याच भावनेने करावी जेणेकरुन त्यांना मानसिक समाधान आणि आत्मिक आनंद मिळत राहील हाच उपदेश बाबा गुरबचनसिंहजी महाराजांनी सदैव दिलेला आहे.सद्गुरुच जीवनाची प्रत्येक शिकवण देत असतात आणि कधी कधी तर आपले कुटुंब आणि नातेवाईकांना सर्वांसमोर अगदी परखड गोष्टी अशासाठी सांगतात की, गुरमत काय सांगत आहे आणि गुरमताविरुध्द उचललेले पाऊल कशाप्रकारे हानिकारक होऊ शकते. बाबा गुरबचनसिंहजी तर अगदी लहान-सहान गोष्टीतही मोठ्यात मोठा उपदेश देत असत.

शहनशाहजी स्वत:चे वडील असूनही त्यांना सद्गुरु म्हणून प्राधान्य देऊन बाबा गुरबचनसिंहजींनी त्यांची गुरुरुपातच पूजा केली, सन्मान दिला आणि त्यांची सेवा हे आपले सुदैव मानले. गुरबचनसिंहजी रात्र-दिवस सद्गुरु शहनशाहजींच्या सेवेमध्ये कार्यरत असत, त्यामुळे गुरबचनसिंहजींचे नाव सेवा आहे की सेवेचे नाव गुरबचनसिंहजी आहे याचे अनुमान करणे कठीण होत असे. कदाचित दोघेही एक-दुसऱ्यासाठी सगुण आणि निर्गुणाचे स्वरुप होते.

बाबा गुरबचनसिंहजी म्हणजे कधीही न थकणारं, अविरत परिश्रम करणारं एक मानवी जीवन! त्यांनी आपल्या शरीराला काम करण्यात असे काही गुंतवून ठेवले की, पाहणारे आणि ऐकणारे आश्चर्यचकित होऊन जात असत. त्यांनाही असं वाटायचं की, आमची तरुण पिढी. ज्या पिढीला आपल्या जीवनाची दिशा अजूनही निश्चित करायची आहे, तिने या गोष्टीची कदर करावी आणि मेहनत करण्यापासून

अंगचुकारपणा करता कामा नये. ज्या लोकांनी बाबा गुरबचनसिंहजींना अगदी जवळून पाहिले आहे त्या लोकांची बुध्दी बाबाजींच्या कार्यप्रणालीचा विचार करुन चकित होऊन जात असे. घर परिवार, मंडळ, समाज, कारखाना, सरोवर, दूध प्रकल्प, शेतीवाडी, औषधोपचार आणि विश्वकल्याणाच्या इतर कार्यासाठी बाबाजी आपला बहुमुल्य वेळ कसा काय देतात आणि सर्व गोष्टीकडे ध्यान कसे ठेवू शकतात हा विचार इतरांच्या मनात घोळत असे. परंतु बाबा गुरुबचनसिंहजीनी या गोष्टी प्रत्यक्ष कृती करुन दाखविल्या, इतकेच नव्हे तर इतरांसाठी ते प्रेरणेचे स्त्रोत बनून राहिले.

बाबा गुरबचनसिंहजी आपल्या गुरुभक्तांना माणुसकीने युक्त अशा मनुष्य रुपात पाहू इच्छित होते. ज्याप्रमाणे आई आपल्या मुलाचे पालन-पोषण करते आणि संरक्षणही करते. त्याचप्रमाणे सद्गुरु सुध्दा आपल्या गुरुशिष्यांचे संरक्षण करतात, परंतु त्यांच्या पावन-पवित्र आत्म्यावर कधीही कोणत्याही लोभ-मोह-लालसा यांचा मळ बसू देत नाही. मानवी मनाला मायावी चक्रात आणि भ्रमात टाकणारी सर्वाधिक गोष्ट असेल तर ती धनदौलत! ही गोष्ट सद्गुरु जाणत असतात. सद्गुरु आपल्या गुरुशिष्यांना जसे मायेच्या लोभापासून वाचवतात तसे संत-महापुरुषांना निढळाच्या घामाने कमविलेल्या कमाईची सेवा करण्यासाठी वास्तविक पध्दतीने कसा वापर करावा हे सुध्दा शिकवितात. कारण गुरु घरातील पैशांचा वैयक्तिक स्वार्थाच्या हव्यासापोटी वापर केला तर मग हे एक असे विष आहे की, ज्याचा परिणाम हळू-हळू होत असतो.

मानवी मनाचा हा कमकुवतपणा आहे की, जसे आपले ध्यान असेल त्यानुसार त्या कसोटीवर तो दुसऱ्यांची पारख करतो. दातार प्रभूच्या घरी कोणत्याही वस्तूची कोणतीही उणीव तर नसते. जेव्हा शिष्य सेवा, सत्संग, नामस्मरणाच्या धुंदीने समर्पणाच्या भावनेत तल्लीन होऊन जातो, तेव्हा त्यांची सेवाभावना पाहून सद्गुरु त्यांना आपल्या आध्यात्मिक मंडळात एखादी जबाबदारी सांभाळण्याची सेवा बक्षिसादाखल देतात. प्रत्येक शिष्याची भावना हीच असते, की मंडळाच्या सत्याच्या प्रचारासाठी जास्तीत जास्त योगदान देता यावे, परंतु शिष्याचे स्व-सामर्थ्य पुष्कळच मर्यादित असते. ज्या गुरुशिष्यांना मोठ-मोठया जबाबदाऱ्या दिलेल्या आहेत त्यांना आपली शारीरिक विश्रांती, कौटुंबिक संबंध आणि सामाजिक मिळणे जुळणे इत्यादींचा त्याग करावा लागतो आणि प्रत्येक गुरुशिष्याला खूष ठेवण्याचा प्रयत्न करावा लागतो. अर्थात हे कर्मदेखील सद्गुरुचंच असतं, जे प्रत्येक मनुष्याला खूष करत राहतं. प्रत्येकाच्या भावनेची ते कदर करतात आणि प्रत्येकाला मार्गदर्शनही करतात.

मनुष्य म्हणजे समाजाचे एक अभिन्न अंग आहे. समाजाशिवाय मनुष्याचे कोणतेही अस्तित्व नाही मानव समुदायाला समाज असे म्हणतात आणि त्याची निर्मिती मनुष्यच करतो ही गोष्ट तर निर्विवाद सत्य आहे. ज्या

प्रवृत्तिच्या लोकांची विपुलता असेल तसाच समाज बनला जाईल. इतिहास या गोष्टीचा साक्षी आहे की, अवतारी महापुरुषांनी माणुसकीचा धडा शिकवून-शिकवून समाजाला असे 'मनुष्य' म्हणून सादर केले की, ते निरोगी समाजाचा पाया बनू शकले. माणुसकीचा हा उगम समाजाच्या पाठीचा कणा आहे, ज्याच्या आधाराने समाज उभा राहू शकतो. माणुसकीच्या याच पुजाऱ्यांना समाजाने अतोनात सतावले आणि त्यांची परीक्षाही घेतली हे नाकारता येत नाही. त्यांचा जीवनप्रवास काट्यावर चालण्याप्रमाणे होता. अर्थात अवतारी महापुरुषांनी काट्यांनाही फुलं समजून त्यांचा स्वीकार केला. बाबा गुरबचनसिंहजींनी समाजाला अशी शिकवण दिली की, जोपर्यंत मनुष्य मानवी गुणांचा स्वीकार करत नाही तोपर्यंत 'ही धरती आहे मनुष्यमात्राची' असे आम्ही म्हणू शकत नाही. सद्गुरु असा माणूस बनवतो, की जो स्वतः जीवन जगवून दाखवतो केवळ शाब्दिक बोलांनी किंवा मोठ-मोठे प्रताप दाखवून लोकांना खूष करत नाहीत. 'ज्ञानाच्या सुंदर नकाशात निर्मळतेचा रंग भरायचा आहे' ही आठवण सद्गुरु आम्हाला देतात. सद्गुरु समाजाला ज्ञानाचा नकाशासुध्दा देतात आणि त्यात आपल्या भक्तांच्या माध्यमातून शुभकर्माचे रंगसुध्दा भरतात. भक्त जेव्हा ज्ञान कर्मामध्ये उतरवतात तेव्हा त्यांच्या मार्गात अनेक अडचणी निर्माण होतात. भक्ताची पोहच सद्गुरुपर्यंतच असते. जेव्हा शिष्य एखाद्या बिकट पेचात फसला जातो तेव्हा तो मार्गदर्शनासाठी आपल्या सद्गुरुपर्यंत धाव घेतो. सद्गुरु आपली शिकवण आणि मार्गदर्शन यात बदल करत नाहीत.

बाबा गुरबचनसिंहजी म्हणजे एक कर्मयोगी व्यक्तिमत्व. बोल बोलण्यापेक्षा कर्म करण्याच्या भाषेची शक्ती ते जास्त जाणत होते. गुरुशिष्यांचे स्वतःचे जीवन निर्मळ बनून बहरावं आणि सांसारिक प्राणिमात्राच्या जीवनात निर्मळता आणण्याकरीता ते जीवन सहयोगी म्हणून सिध्द व्हावे यासाठी बाबा गुरबचनसिंहजी प्रत्येक बाजूने आपल्या गुरुशिष्यांना सावध करीत असत. बाबाजींना मोठे-मोठे बोल उच्चारलेले आवडत नसत. त्यांच्याजवळ एवढे दैवी सामर्थ्य असूनही ते स्वतः कधीही मोठे-मोठे दावे करत नसत. आपल्या गुरुशिष्यांनी देखील अशा मोठ-मोठे दावे करण्याच्या वल्गना करु नये अशी इच्छा बाळगीत असत. सत्संगामध्ये सदैव सत्यच प्रगट करावे, इतरांकडून शाबासकीची थाप मिळविण्यासाठी पोकळ वल्गना करु नये असे बाबाजी इच्छित होते.

बाबा गुरबचनसिंहजी यांनी प्रत्येक समस्येचे उत्तर तिच्या मुळातून काढले आहे. जे जाणत होते की, जर एखाद्या इमारतीचा पाया ठिसूळ असेल तर त्या ठिसूळ पायावर उभी केलेली भव्य उत्तुंग इमारत, जिला कितीही सजविली तरीही कधीतरी



ती धोकादायक होतेच. थोडेसे मुसंडी मारणारे पाणी किंवा वाऱ्याचा झोका, जो पुराच्या रुपाने, वादळ किंवा धरणीकंपाच्या रुपाने असो; त्या इमारतीचा पाया ठिसूळ असल्याने तिला कधीही जमीनदोस्त करुन टाकतो. ठीक याप्रमाणेच मानवी जीवनाची दशा आहे. मनुष्य मोठ-मोठ्या आदर्शाच्या उत्तुंग इमारती बनविण्याचा आणि त्या आदर्शाप्रमाणे चालण्याचा प्रयत्नही करतो. परंतु ब्रह्मज्ञानाच्या मजबूत पायाशिवाय हे आदर्श मानव जीवनाला उत्तुंग टप्प्यापर्यंत नेऊ शकत नाही.

श्रध्दा आणि विश्वास या मानवी मनाच्या नाजूक भावना, ज्या सदैव पायदळी तुडवल्या जात आहेत. या निराकार प्रभुने मानवाला बुध्दी नावाची प्रभावी देणगी दिली आहे. या बुध्दीच्या जोरावर मानव चांगल्याप्रकारे समजला आहे की, सर्व सृष्टीला नियमबध्द चालवणारी एक परमसत्ता अस्तित्वात आहे. ही परमसत्ता सूक्ष्म, अतिसूक्ष्म असून मन आणि बुध्दीच्या तावडीत न सापडणारी कोणती तरी एक असीम शक्ती या ब्रह्मांडाचे नियंत्रण करत आहे असा विश्वास मानवाला असूनही तो कित्येकदा अनाठाई गोष्टींच्या नादी लागतो. कारण या परमसत्तेची जाण त्याच्या आवाक्या पलीकडची आहे.

मनुष्य संस्कारपूर्ण शरीर घेऊनच जन्माला येतो, त्यानंतर येथे कोणतेही संस्कार निर्माण होत नाहीत. जसे आपण आंब्याचे बीज पेरतो तेव्हा आंबाच उत्पन्न होतो आणि जर कोठे बाभळीचे बीज पेरले तर तेथे बाभळीच उत्पन्न होणार. आपण कितीही चांगल्या प्रकारचे खत बियाण्यासोबत घातले तरीही बाभळीऐवजी आंब्याचे उत्पन्न काढू शकत नाही. याप्रमाणे जेव्हा आपण या जगात येतो तेव्हा संस्काराचे गाठोडे सोबत घेऊनच येतो. ते संस्कार बीज रुपातच असतात. ते तर आपण बदलवू शकत नाही.

अध्यात्म दर्शन हे तर अतिशय सूक्ष्म आहे. याचे कारण असे की, आत्मा-परमात्मा, दैवी प्रणाली, कर्म आणि फळ, जन्म-मृत्यूचे चक्र, संस्कार इत्यादी विषय इतके सूक्ष्म आहे की, कोणत्याही विज्ञानाच्या प्रयोगशाळेत त्यांची परीक्षा केली जाऊ शकत नाही. आपला स्वत:चा आत्मानुभव, निराकार प्रभूचे साकार रुप सद्गुरु आणि दिव्य पुरुषांची अनमोल वचनं या द्वारेच या विषयांची परीक्षा केली जाऊ शकते. या कारणांमुळे आध्यात्मिक क्षेत्रात जेवढा वादविवाद झाला आहे, तेवढा इतर क्षेत्रामध्ये झालेला नाही. जर मानवाला पूर्ण ब्रह्मवेत्ता सद्गुरु किंवा दिव्य अवतारी पुरुषांना शरण जाण्याची संधी मिळाली नसेल किंवा शरण जाण्यासाठी अज्ञानतेमुळे कोणत्याही प्रकारचा संकोच करत असेल, अशावेळी तो अशा तत्वज्ञ लोकांच्या तावडीत सापडतो की ते लोक त्याला या सूक्ष्म तत्त्वज्ञानाच्या चक्रात गुंतवून ठेवतात.

बाबा गुरबचनसिंहजींनी मानव एकतेची गाठ इतकी घट्ट बांधली होती की, ती कोणाकडूनही सहजपणे सुटू शकत नव्हती. गुरुने आपल्या भक्तांची पूजा, सेवा आणि सत्कार स्वत:समान केलेला आहे, असे उदाहरण या वर्तमान काळात निरंकारी मंडळाशिवाय जगाच्या इतिहासात कुठेही आढळत नाही. आपल्या स्टेजवर (गुरुगादीवर) प्रत्येकाला बसण्याचा, पूजा करण्याचा आणि नमस्कार करण्याचा हक्क दिलेला आहे. हे कार्य निरंकारी मंडळाच्या अवतारी प्रेषितांनी करुन दाखविले आहे. त्यांनी 'गुरसिख पूजदा' या सिध्दांताची पुनरावृत्ती केली. यामुळे हे अटळ सत्य दूर-दूरवर पसरु शकेल आणि समाजात दैवी महापुरुषांचे बंधुत्व एक उदाहरण बनू शकेल. मालक आणि नोकर, पुढारी आणि जनता, अधिकारी आणि कर्मचारी हे पारस्परिक प्रेम, सेवा-भावना आणि माणुसकीच्या सूत्रामध्ये गुंफले जातील तर अनेक समस्या, ज्या चिंता आणि बिकट पेचप्रसंग निर्माण करतात, त्या स्वत:हून संपून जातील. सेवा भावनेने केलेले कार्य खूशी आणि आनंद प्रदान करतो आणि प्रत्येक जबाबदारी स्व-खुशीने पार पाडली जाते. अशाप्रकारे प्रत्येक वरिष्ठापासून कनिष्ठापर्यंत सर्वजण आपले पद आणि खुर्ची केवळ प्रबंधकीय व्यवस्थेचा दुवा समजून, प्रत्येक माणसाच्या भावनेची कदर करतील आणि आपल्या कर्तव्यांची ओळख करुन घेतील तर ही धरती स्वर्गमय बनू शकेल. मग इतर कोणत्याही स्वर्गाची लालसा राहणार नाही.

संत निरंकारी मिशनचे समाजोध्दारक कार्य

चराचर विश्व निर्मितीतून मानवी उत्पत्ती आकारास आली. आदिमानवी उत्पत्तीपासून आजच्या विद्यमान वैज्ञानिक युगातही मानवाने उन्नतिचं गौरवास्पद सर्वोच्च शिखर गाठलं आहे. ही अत्यंत कौतुकास्पद गोष्ट आहे. मानवी उत्पत्तीच्या प्रारंभिक काळात गुहा किंवा पर्णकुटीत राहणारा आदिमानव आज वैज्ञानिक युगात आलिशान महालमाड्यात सुखोपभोग घेत आहे. आदिमानवी काळात विशिष्ट अंग झाकण्यापुरती वल्कले धारण करणारा मानव आज महागडी भरजरी वस्त्र परिधान करुन दिमाखाने मिरवतोय. त्यावेळी कंदमुळांवर उदरनिर्वाह करणारा मानव आज सुग्रास पंचपक्वान्नांच्या तृप्तीचा आस्वाद घेतोय. इतकंच नव्हे तर नित्योपयोगी मानवी गरजांच्या पूर्ततेसाठी आविष्कारांची घोडदौड म्हणजे विश्वनिर्मात्याने मानवास दिलेल्या विलक्षण बुध्दिमत्ता आणि प्रचंड विचारशक्ती या अपूर्व देणगीचा कौशल्यपूर्वक केलेला वापर होय. जिथे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी पायी किंवा बैलगाडीने काही महिन्यांचा अवधी लागत होता. तिथेच आज मनुष्य आधुनिक वाहनांद्वारे काही तासातच दाखल होत आहे. जिथे एखादा निरोप-संदेश पाठविण्यासाठी काही दिवस-महिने लागत होते, तिथेच आज मनुष्य जगाच्या पाठीवर कुठेही दूरध्वनी आणि मोबाईल या अत्याधुनिक यंत्रणेमार्फत काही मिनिटात संपर्क साधत आहे. जगाच्या नकाशावर घडणारी कोणतीही घटना दूरदर्शनचं बटन दाबताच एका क्षणार्धात डोळ्यासमक्ष पाहायला मिळतेय.

दिवा कितीही प्रकाशमान असला तरी दिव्याखाली अंधार असतो अशी उक्ती आहे. मानवी अवस्थाही तशीच आहे. मानवाने केलेली उन्नती कितीही प्रकाशमान असली तरी त्या उन्नतीच्या खाली अधोगती, अवनतीचं अंधकारमय साम्राज्य पसरलेलं आहे आणि त्या साम्राज्याची निर्मिती मानवी हातांनीच केली आहे. या साम्राज्यात व्याभिचार, अत्याचार, भ्रष्टाचार, हिंसाचार, नारी अबलांवर बलात्कार, खून-दरोडे, रोगभ्रष्ट करणारी नशिली व्यसनं यांचा वणवा पेटला असून त्याला कारणीभूत झालेला मनुष्य स्वतःच होरपळून निघत आहे. पूर्वी महायुध्द पेटत होती; आज जात-पात, धर्म, देवस्थानांसाठी लढायांची ठिणगी पडून रक्ताचे पाट वाहात आहेत. जगाच्या नकाशावर दृष्टिक्षेप टाकला तर दिसून येत आहे की, मानवाने स्वतःच निर्माण केलेल्या उन्नती आणि अधोगतीच्या चक्रव्युहात मानवी जीवनाची दशा बिकट झालेली आहे. मानवी जीवनाची ही बिकट दशा सुधारण्यासाठी आज अनेक सुधारणावादी सामाजिक संस्था हिरिरीने कार्यरत आहेत हे निश्चित. परंतु सुधारणावादाचे कितीही ढोल बडवले तरीही यशाचे माप किती पदरी पडले हे दृष्टिपथास येत नाही, ही खेदाची गोष्ट आहे.

अत्यंत समाधानाची गोष्ट म्हणजे संत निरंकारी मिशनने आध्यात्मिक कार्याला जोडलेली समाजोध्दाराची झालर. याचं सारं श्रेय युगप्रवर्तक सद्गुरु बाबा गुरबचनसिंहजी महाराजांनी राबविलेल्या उपक्रमांना आहे. अनावश्यक खर्च, डामडौल, कोणतीही रोषणाई किंवा डोळे दिपविणारा झगमगाट यांना फाटा देऊन सत्संगातील

संत महात्म्यांच्या उपस्थितीत अत्यंत सोपी आणि अत्यल्प खर्चाची निरंकारी विवाह पध्दती; जेणेकरुन आयुष्याची होळी करणाऱ्या हुंडाराक्षसाचा नायनाट व्हावा. एकदा का जात-पात धर्माचा अभिमान त्यागला की, मागे उरतो तो माणूस! म्हणून माणुसकी उन्नत करण्यासाठी सर्वधर्म समभाव, सर्वधर्म मैत्री, धर्म निरपेक्षता इत्यादिंच्या परिपूर्तीसाठी आंतरजातीय विवाह! समाजाला काळीमा फासणारी, कुटुंबाची धूळधाण करणारी, तरुणांच्या आयुष्याची माती करणाऱ्या दारु-गर्द-गांजा-तंबाखू इत्यादी मादक नशा आणणाऱ्या पदार्थांचा त्याग. असे अनेक समाजोपयोगी उपक्रम अमलात आणण्याचे आव्हान बाबा गुरबचनसिंहजींनी केले आणि लाखो निरंकारी भक्तांनी हा आदेश अमलात आणून आपले जीवन सुखी केले.

आज माणूस माणसाच्या जीवावर उठलाय, मानवी रक्ताची चटक लागलीय त्याला. परंतु रक्त वाहण्याचे ठिकाण रस्ता, जमीन किंवा माती नव्हे. ते रक्त माणसाच्या धमणीतून वाहावे आणि त्याला जीवनदान मिळावे म्हणून जात-धर्म-पंथ न पाहता मानवी रक्ताचा प्रत्येक बिंदू रुग्णाच्या रक्तात जावा यासाठी रक्तदानाचे पवित्र कार्य विद्यमान सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी आरंभिले आहे.

संजय तुकाराम जालगांवकर
मुंबई

संत निरंकारी (मराठी) मासिकाचे
मालक हक्क व इतर तपशील संबंधी
(केंद्र सरकारच्या फॉर्म ४ नियम ८ अन्वये)

प्रकाशन स्थळ
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४

प्रसिध्दी काळ
मार्च २०१३ मासिक (दरमहा)

मुद्रकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४.
भारतीय

प्रकाशकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४.
भारतीय

संपादकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
श्री. चंद्रकांत अनंत जाधव
संत निरंकारी सत्संग भवन,
५०, मोरबाग रोड, दादर, (पूर्व) मुंबई-१४.
भारतीय

मालकाचे नाव, पत्ता व राष्ट्रीयत्व
संत निरंकारी मंडळ
माहूल रोड, चेंबूर कॅम्प, मुंबई-७४.
भारतीय

मी श्री. चंद्रकांत अनंत जाधव प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

दि. १-३-२०१३

श्री. चंद्रकांत अनंत जाधव
प्रकाशक व संपादक

हीच मानवता

विश्वाची निर्मिती करणाऱ्या विधात्याने अनमोल मूर्ती बनवली ती मानव होय, याला पंचतत्वाचा पुतळा म्हणतात. विश्वाचे व पंचतत्त्वाचे संचलन ईश्वरच करतो. तो एकच आहे. म्हणून जात, भेद, धर्म, उच्च-नीच नसलेले साकाररुप म्हणजे मानव होय.

ज्याच्या जवळ प्रेम, नम्रता, आदर-सत्कार, सहिष्णुता, परोपकार, दया, क्षमा, शांती आहे तो मानव! मुक्तीचे खरे द्वार म्हणजे मानव होय. या जगात सर्वात मोठा परोपकार जर कोणता असेल तर तो म्हणजे मानवाला त्याच्या निजस्वरुपाचा बोध करुन देणे किंवा सहज अवस्था प्रदान करणे यालाच आध्यात्मिक भाषेमध्ये ब्रह्मज्ञान प्रदान करणे असे म्हणतात.

वास्तविक हे ज्ञान अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष असते. तो ज्ञानबोध यज्ञाने, तपाने, दानाने किंवा धर्मग्रंथ शास्त्रांच्या पठणाने होऊ शकत नाही. संसारात भरकटत जाणाऱ्या मनुष्याला मानवतेचे गुण हवे असतील अथवा मनुष्यधर्माचा विकास व्हावा असे जर अंत:करणापासून वाटत असेल तर त्याने पूर्णब्रह्म दाखविणाऱ्या सदगुरुचा शोध घ्यावा. त्याच्यापाशी साऱ्या सुखसाधनांची व गुणकर्मांची खाणी आहे.

ईश्वरीभेद प्रगट करणारा केवळ सदगुरु असतो, बाकी सर्व तंत्रमंत्राचे धनी असतात. त्यांच्या सान्निध्यात आत्मा दु:खी असतो. तो वर काही उठत नाही. सुखाची साधने वाढतात पण त्यांच्या चिंता जाळतात. सदगुरु तसा कधी नसतो, तो मार्ग दाखवतो, योग्य दिशेने पाऊल उचलायला लावतो. भरकटत असेल तर रस्त्यावर आणून देतो, अशाच दुर्धर समयी धर्माची स्थापना करण्यासाठी एका महामानवाचे आगमन होते.

ज्याला शास्त्रामध्ये सदगुरु म्हणून संबोधिले गेले आहे. तो एकच काम करतो आणि ते म्हणजे रस्ता चुकलेल्या, भरकटलेल्या लोकांना एका सत्य परमात्म्याशी जोडतो. एकाला जाणा, एकाला माना व एक व्हा असा उद्घोष करुन ब्रह्मबोधाद्वारे भ्रमाची समाप्ती करतो. एका परमात्म्याची ओळख करुन देऊन तो जाणीव करुन देतो की, जे तुझ्यामध्ये आहे तेच सर्वांमध्ये आहे. ज्याला या सत्याचा बोध होतो तो ते सर्वांभुती परमेश्वर पाहू लागतो आणि सर्वांशी प्रेम करु लागतो.

वर्तमान समयाला सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज विश्वभरातील लोकांना एका प्रभू-परमात्म्याची भेट घडवून खऱ्या अर्थाने मानवतेचा धडा देत आहेत. प्रेम, नम्रता, सहनशीलता, दया, शांती आणि विशालता आदि गुणांनी युक्त होणे हीच मानवता होय. इतरांचे दु:ख स्वत:च्या दु:खाप्रमाणे मानून त्या दु:खातून बाहेर काढण्यासाठी यथाशक्ती मदत करणे हीच मानवता होय.

श्री. जनार्दन हाशा पाटील
झोनल प्रमुख (नाशिक क्षेत्र)
मु.पो. नारिंगी (विरार)

मुद्याची गोष्ट



बुध्दिवान मनुष्य सर्व प्राणिमात्रात परमात्म्याच्या स्वरुपाचे चिंतन करतच आपले जीवन व्यतीत करतो. मनुष्य जन्म अतिशय दुर्लभ असल्याने तो ईश्वराच्या कृपेने लाभला आहे त्यामुळे जीवनातील महत्त्वपूर्ण वेळेपैकी एक क्षणभरही आपण व्यर्थ गमवू नये. ज्या कामासाठी मनुष्य जन्म घेतलेला आहे ते काम सर्वप्रथम केले पाहिजे. जे काम आपल्या हयातीत आपल्याशिवाय इतर लोक करु शकतात ते त्यांच्याकडून करवून घ्यावे. त्या कामात आपला मौल्यवान वेळ लावू नये. जे काम आपले उत्तराधिकारी करु शकतात, मग ते कितीही गरजेचे का असेना त्या कामातही आपला मौल्यवान वेळ घालवू नये; परंतु जे काम आपल्या जीवनातील आपल्याशिवाय इतर कोणीही करु शकणार नाही किंवा आपल्या मृत्यूनंतरही अन्य कोणाद्वारे होऊ शकणार नाही असे काम आधी केले पाहिजे. तसेच ज्या कामासाठी आपल्याला हा नरदेह मिळाला आहे आणि ज्या कामात थोडीशीही त्रूटी राहिल्यास आपल्याला पुन्हा जन्म घ्यावा लागतो, त्याचबरोबर ज्या कार्याची पूर्तता आपल्याशिवाय दुसऱ्या कुणाकडून होऊच शकणार नाही ते काम सर्वाधिक महत्त्वाचे व गरजेचे समजून तत्परतेने सर्वप्रथम केले पाहिजे; ते काम आहे परमात्म्याची प्राप्ती! आणि परमात्म्याच्या प्राप्तीचा एकच उपाय आहे, तो म्हणजे पूर्ण सदगुरुला शरण जाऊन ब्रह्मज्ञानाची प्राप्ती करुन घेणे. ईश्वराची ओळख करुन घेऊन खऱ्या भक्तीला सुरुवात करावी कारण -

भक्ति सुतंत्र सकल सुख खानी।
बिनु सतसंग न पावहिं प्रानी।।

(श्रीरामचरित. उ.कां४४/३)

भक्तीमुळे खऱ्या सुखाची प्राप्ती होते. जीवाला कितीही मोठ्यात मोठ्या पदाची किंवा पदार्थाची प्राप्ती झाली तरी जोपर्यंत परमात्म्याची प्राप्ती होत नाही तोपर्यंत त्याची भूक मिटत नाही. कारण परमात्म्याशिवाय सर्वकाही अपूर्ण आहे. पूर्ण केवळ परमात्माच आहे. म्हणून परमात्म्याला जीवनात स्थान दिल्याशिवाय जीवनाला पूर्णत्व येत नाही. परमात्मा प्राप्ती हा अहंकार नाशावरील एकमात्र उपाय आहे. अहंकार म्हणजे अज्ञान हेच सर्व दु:खाचे मूळ आहे. त्यामुळेच जीवनात मानापनाचे, उच्चनीचतेचे, विषमतेचे अनेक दु:खदायी प्रसंग उद्‌भवतात.

एकदा जनक राजाच्या नगरीत एक विद्वान पंडित आला. त्याला वाटले जनक राजा आपला आदर-सत्कार करुन सन्मानाने आपल्याला घ्यायला येईल म्हणून त्याने आपले परिचयपत्र लिहून आपण येत असल्याचा निरोप राजा जनकाकडे पाठवला. राजा जनक विद्वानांचे भोक्ते असले तरी ते स्वत: विदेही आणि सर्वज्ञ होते. त्यांनी त्या विद्वानाला संदेश पाठवला, 'आपण एकटे असता तर फार बरे झाले असते...' विद्वानाने राजाचा संदेश जाणला. त्याचा अहंकार गळून पडला. ब्रह्मज्ञानी संतांच्या किंवा सदगुरुच्या भेटीला जाताना आपला अहंकार, विद्वता, प्रतिष्ठा मागेच सोडून जावे लागते. तेव्हाच आपण खऱ्या कृपाशीर्वादाचे भागीदार ठरतो.

संत महात्मा फाफट पसारा सोडून मुद्याची गोष्ट नेहमी ध्यानात ठेवून वर्तन करतात.

सौ. रश्मी राजेंद्र थोरात
बोरिवली, मुंबई

आपुलकीचा भाव जागवूया सारी दुनिया एक करुया

अजुनपर्यंत हेच आलंय पाहण्यात
फक्त माणसंच तक्रारी घेऊन जातात पोलीस ठाण्यात
पण मला याचंच आश्चर्य वाटलं,
जेव्हा एका गाढवाने तक्रार घेऊन थेट पोलीस स्टेशन गाठलं
म्हणाला साहेब, आम्ही ऐकलंय शहाण्याने कोर्टाची आणि पोलीसांची पायरी चढू नये कधी
म्हणूनच तर आम्ही चढत नाही कधी, पण नाईलाज होता म्हणून सर्वांनीच पाठवलंय मला आपला प्रतिनिधी
ही गोष्टच खेदाची आहे फार कारण आमची माणसाविरुध्दच आहे तक्रार
म्हणून पहिला आमचा FIR नोंदवून घ्या आणि आम्हाला योग्य तो न्याय मिळवून द्या
आम्हाला टेंशन झालंय जगण्यात नाही राम, आमचं बिघडलंय काम
कारण नाक्यानाक्यावर आज मानवतेचं ट्रॅफिक झालंय जाम
आज तुमचा माणूस विज्ञान क्रांतीच्या, विश्व शांतीच्या मोठ्यामोठ्या बाता करतोय
आणि एकमेकाला अभिमान, गर्व, स्वार्थाच्या गाढवासारख्या लाथा मारतोय
आज माणसाकडे गाडी आली, चालायला विसरलाय, मोबाईल आलाय बोलायला विसरलाय,
टी.व्ही., इंटरनेट आलंय, हिताचं बघायला विसरलाय
खरं सांगू साहेब, तुमचा माणूस आपुलकीच विसरलाय
देवालाही अपेक्षित होता माणसाचा सत्कार
पण माणूसच करतोय खून दरोडे चोरी भ्रष्टाचार
आणि हीच आमची तक्रार आहे की, माणसाची का गत अशी आहे ?
जगात पशुपक्ष्याला नाही, फक्त माणसालाच का फाशी आहे ?
कारण एकच माणसात आपुलकी आपलेपण नाही, मिलवर्तनाचं मन नाही, एकत्वाच नंदनवन नाही
माणुसकीच सत्व नाही, आध्यात्मिकतेच तत्व नाही, म्हणून माणसाचंच माणसाला महत्व नाही
हीच मोठी शोकांतिका, खंत आहे आणि वाटू लागलय खरच एकतेचा अंत आहे ?
पोलीस अधिकारी म्हणाले माणसाच्या या मानसिकतेच्या जखमेवर कुठेच मलम नाही
आणि या तुमच्या तक्रारीवर आमच्याकडे IPC कलम नाही
पण म्हणाले याची करु नका खंत कारण ते अधिकारी होते निरंकारी संत
म्हणाले हा आमचा वायदा आहे,
या तक्रारीवर निरंकारी बाबाजींकडे आध्यात्मिक संस्काराचा कायदा आहे
आणि साऱ्या जगालाच याचा फायदा आहे
आम्ही कारागृहात सुध्दा निरंकारी सत्संगाच करतोय आयोजन
ब्रह्मज्ञानाद्वारे आपुलकी आपलेपण, मिलवर्तन, एकत्व हेच आहे प्रयोजन
निरंकारी बाबाजी सांगतात, परमपित्याची ओळख करुन एकच काम करुया
आपुलकीचा भाव जागवू या, सारी दुनिया एक करुया

श्री. बाळकृष्ण जयराम कासार
खेड (रत्नागिरी)

मानव एकता दिवस

भल्या भल्यांचा नाश जाहला, न जाणता एकता,
मत मतांतरातूनी नष्ट झाली मानव एकता
वैर, द्वेष या मनात येता दिसेल का एकता,
दुष्ट विचार अन् स्वार्थापायी निर्माण झाली शत्रुता
एकता मनी या येण्यासाठी एक पित्याला ओळखूया
एकत्वाच्या मार्गे चालून, विश्व हे सुंदर सजवूया ।।१।।

प्रेम, नम्रता, आपुलकीने, येईल जीवनात एकता,
सद्गुरुंच्या अनुकंपेने वसेल, मानवात मानवता,
मानवीय गुणांचा स्वीकार करिता, नांदेल जगी एकता,
मानवाला मानव प्रिय होईल, एकमेका आधार देता,
एक होण्या आपण सारे, एकाची कास धरुया,
एकत्वाच्या मार्गे चालून, विश्व हे सुंदर सजवूया ।।२।।

एकत्वाचे महत्व कळता, राहतील सारेच खुशाल,
गुरुकृपेने दिसेल जगाला, मानव एकतेची मिसाल,
परोपकारासाठी झटण्या इतके, मन होईल विशाल,
समजताच संदेश गुरुचा, एकत्व मनी बसवाल,
म्हणे 'सोनाली' ज्ञानाधारे जीवन हे सारे जगुया
एकत्वाच्या मार्गे चालून, विश्व हे सुंदर सजवूया ।।३।।

- कु. सोनाली गुलाब चव्हाण
शहाड (कल्याण)

एकता

चाखताच मध मी
गोडी त्याची तोंडात साठली
अन् त्याचक्षणी मधमाशांची
आठवण मनात दाटली
काय त्यांची करामत मोठी
इवल्याशा जिवाने करावी
मधाची साठी
शक्य होतं का एकटीला ?
इतका मध साठवणं ?
आणि मोहोळ तयार करणं ?
पण कोडं नंतर मलाही उलगडलं
एकतेमुळेच त्यांच्यात
ते कर्म घडलं
एकतेने शक्य आहे सर्व काही
मनात आलं तर!
मात्र एकतेशिवाय काहीच नाही
आज मानवाला विचारावसं वाटतं,
एकतेमुळे सांग!
काय मिळणार नाही तुला ?
कशाच्या नावावर भांडतोस तू
जातीच्या, धर्माच्या की भाषेच्या
या आहेत कोणाच्या हिताच्या ?
मानवाच्या ?
जाण तू आता तरी
तुझ्या कर्तव्याला,
जाण तू आता तरी
तुझ्या मूळ स्वरुपाला,
एकाच प्रभुची लेकरे सारी
संत आवाज देती घरोघरी
मानवा बघ तुझं खरं स्वरुप
सद्गुरु "हरदेवाच्या" चरणावरी
एक आहोत आपण सारे
एकतेचा भाव मनी धरुया
आणि हा मानव जन्म सार्थ करुया

- लतिका पालव
डोंबिवली (प.), जि. ठाणे

सामूहिक विवाह

मानी गोड प्रभू इच्छेला व्यर्थ समय तू दवडू नको।
म्हणे अवतार चौथा प्रण हा गृहस्थी सोडूनी जाऊ नको।

४६व्या महाराष्ट्र संत समागमप्रसंगी त्रिवेणीच्या शुभार्शीवादाने १३९ जोडप्यांनी गृहस्थाश्रमामध्ये पदार्पण केले.

गुरु वंदना समारोह

हृदय में डेरा

नम्रता
प्रेम

वंदना

आयुष्याचा पहिला धडा कर्तव्य होय

वेलतला पहिला धडा जोड अक्षराने सुरु होत नसला तरी, आयुष्यातला पहिला धडा जोड अक्षराने सुरु होतो, तो शब्द म्हणजे "कर्तव्य!"

कर्तव्य केल्याने होणारा आनंद हा त्रिभुवनातील सर्व आनंदापेक्षा फार उच्च व दीर्घ काळ टिकणारा असतो. जीवनाच्या धकाधकित खरोखर मोलाचे जतन करुन ठेवण्यासारखे जर काय असेल तर ते माणसाचे सौजन्यशील, संवेदनाशील कर्तव्य व्यक्तिमत्व होय. जीवन ही चैनीची वस्तू नसते तर कर्तव्याची भूमी आहे. आई विना संगोपन म्हणजे सत्व काढून घेतलेले अन्न होय. लोणी काढून घेतलेले दूध व तेज काढून घेतलेली उष्णता होय. उद्याचा भविष्यकाळ आजच्या त्यागातून, आजच्या कर्तव्यातून, कर्मातून निर्माण करावा लागतो. ज्याचा वर्तमान काळ कर्तव्यवादी आहे, त्याचा भविष्यकाळ उज्ज्वल असतो.

झाडांना फळे येतात ती परोपकारासाठी, नद्यातून पाणी वाहते ते परोपकारासाठी, गाय परोपकारासाठी दूध देते. म्हणून ह्या सत्यावर चालण्यासाठी आपले जीवन हे परोपकारासाठी असते. हे विसरता येऊ नये. ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्यापासून आपल्याला हवी ती वस्तू मनुष्य बनवित असतो. त्याचप्रमाणे मनुष्य आपले जीवन कर्तव्यातून घडवित असतो.

समुद्रातील भरती ओहोटीचे प्रकार नैसर्गिक क्रियेने घडत असतात. पण माणसाच्या जीवनातील सुख दुःख त्याच्या चांगल्या वाईट कर्तव्यकर्मानुसार घडत असते. आईकडे अश्रुंचे पाट असतात. आई रडून मोकळी होते पण वडिलांना सांत्वन करावे लागते आणि रडणाऱ्यापेक्षा सांत्वन करणाऱ्यावर जास्त ताण पडतो. कारण ज्योती पेक्षा समई तापते ना! पण श्रेय नेहमी ज्योतीला मिळते. रोजच्या जेवणाची सोय करणारी आई लक्षात राहते पण आयुष्यभरातील शिदोरीची सोय करणाऱ्या वडिलांचे कर्तव्य आपण सहज विसरुन जातो.

माता जिजाबाईने शिवाजी राजांना घडवले असे अवश्य म्हणावे, पण त्याच वेळी शहाजी राजेंची ओढाताण लक्षात घ्यावी. देवकी-यशोदेचे कौतुक अवश्य करावे पण भर यमुना नदीच्या पुरातून डोक्यावरुन श्रीकृष्णाला घेऊन जाणारा वासुदेव पिता अवश्य लक्षात ठेवावा. श्रीराम हा कौसल्या मातेचा पुत्र होता पण वियोगाने तडफडत मरण पावलेला राजा दशरथ होता.

वडिलांच्या टाचा झिजलेल्या चपला पाहिल्यानंतर त्यांच्या कर्तव्याची जाणीव होते. वडिलांचा फाटलेला सदरा पाहिल्यानंतर आमच्या नशिबाची छिद्रे त्यातून पाहायला मिळतात. त्यांची वाढलेली दाढी पाहून त्यांची काटकसर दृष्टीस पडते. मुलांसाठी चांगले नवे कपडे आणतील. पण स्वतःला मात्र जुन्या कपड्यांना ठिगळ लावून ती अंगात घालतील. वडील स्वतः आजारी पडल्यानंतर डॉक्टरांनी आराम करायला सांगितल्यावर त्यांना भीती वाटते, आजाराला ते घाबरत नाही. उपचार करुन ते आपले कामाचे खाडे होऊ देत नाही. कारण घरात लग्नाला आलेली मुलगी त्यांच्या पुढे दिसते. मुलांची शिक्षणं पूर्ण करायची असतात. कारण त्यांच्या घरात उत्पन्नाचं दुसरं साधन नसतं. मुलांचे उच्च शिक्षण होऊन ती कामाला लागेपर्यंत त्यांना चैन पडत नाही. त्यासाठी ते आपल्या जीवाचे रान करीत असतात. त्यांच्या शिक्षणाची फी, कपड्यांचा खर्च, परगावी राहण्याचा खर्च भागविण्यासाठी वडिलांना पैसा कमवायलाच पाहिजे.

मुलाच्या नोकरीसाठी साहेबापुढे लाचार होणारे वडील, मुलीचे लग्न जमविण्यासाठी अनेकांचे ऊंबरठे झिजवणारे वडील, घरच्यांसाठी स्वतःच्या व्यथा दडविणारे वडील किती ग्रेट असतात ना! 'जीवन हे एक सुखाने भरलेला पेला नसून, कर्तव्याने भरलेले माप आहे.' सुखाचे एक वर्ष मनुष्याला काही शिकवत नाही, पण दुःखाचा एक क्षण माणसाला शहाणा बनवतो. हेच शहाणपण म्हणजे कर्तव्याचे पालन करणे होय, कर्तव्याची जाणीव होणे होय. जसं म्हणतात, 'रामावर ठेवावा विश्वास व सुखाने करावा

संसार!' कारण आपल्या वडिलांनी दिलेल्या शब्दाचे पालन रामाने करुन एका मुलाचे कर्तव्य पार पाडले व रामाने वनवास पूर्ण केला.

जेथे कर्तव्याची जागृती आणि भगवंताची स्मृती आहे, तिथे समाधानाची प्राप्ती होते. माणूस हा भावनेवर जगत असतो असे म्हणतात. पण कधी कधी त्याला कर्तव्यासाठी भावनेला आवर घालावा, भावनेला मागे ढकलावे लागते, आणि इतरांसाठी जगतो तो माणूस होय. भगवद्गीतेत अर्जुनाला श्रीकृष्णाने सांगितले, "क्षुद्रं हृदय दौर्बल्यम!" हृदयाची दुर्बलता काढून टाक आणि युध्द करण्याचा निश्चय कर. "युध्दस्य कृत निश्चय!" कर्माच्या क्षेत्रात उभे राहून धर्माचे पालन करणे हे खऱ्या भक्ताचे कर्तव्य होय. हे अर्जुनाला श्रीकृष्णाने भगवद्गीतेद्वारे सांगितले आणि तू कर्म क्षेत्रातच राहून युध्द कर्म कर. त्यापासून तू दूर जाऊ नकोस. एखाद्या निष्ठावंताप्रमाणे कर्तव्याचे पालन कर. श्रीकृष्ण स्वत: सांगतात की, "या त्रैलोकामध्ये मी कर्म केलेच पाहिजे असे नाही तर, मी कर्तव्याचे पालन करतो व मी कर्म रक्षक आहे. जर मी कर्तव्य कर्माचा त्याग केला तर सर्व सामान्य लोकही कर्तव्य कर्मापासून दूर होऊ लागतील आणि सृष्टीची व्यवस्थाच बिघडून जाईल." रामायण काळात वाल्याचा वाल्मिकी झाला. स्वाध्यायाने तिहिरसिंग वांड दरोडेखोराचा तिरुपती झाला. माणूस बदलू शकतो ह्यावर विश्वास हवा. लहान वयात झालेले संस्कार मोठेपणी जीवनात प्रत्येक निर्णयक्षणी कर्तव्याची जाणीव करुन देते. 'जो आपल्या कर्तव्यात कर्मात दक्ष तो मिळवितो मोक्ष!'

एकदा भगवान बुध्दांकडे त्यांच्या शिष्याने देशभर प्रचार करण्याची आज्ञा मागितली. त्यानंतर 'तू सत्याचा प्रचार करशील तर धार्मिक लोक रागावून तुझी निंदा करतील तर त्यावेळी तुला काय वाटेल.' असे भगवान बुध्दांनी शिष्याला विचारले. "मी निंदा करणाऱ्याचे आभार मानीन. ते लोक चांगले आहेत कारण की, त्यांनी रागावून मला मारले नाही." असे शिष्याने भगवान बुध्दांना सांगितले.

"ह्या जगात सर्व प्रकारचे लोक आहेत. काही लोक तुला मारहाण करतील, त्यावेळी तू काय करशील." असे भगवान बुध्दाने परत विचारले. त्यानंतर नम्रतापूर्वकतेने शिष्याने उत्तर दिले. "भगवान मी परत एकदा त्यांचे आभार मानेन की, ते चांगले आहेत व ते माझ्यावर दगडांचा मारा करणार नाही." मग भगवान बुध्दांनी परत सांगितले की, "ह्या जगात सत्याचा प्रचार करणाऱ्यावर दगडांचा मारा करणारे कमी नाहीत. जर असे असेल तर त्यावेळी तुला काय वाटेल." हे ऐकून शिष्य शांत झाला आणि नम्रतापूर्वक म्हणाला, "मी त्यांना ते वाईट आहेत असे समजणार नाही. कारण की त्यांनी माझ्यावर शस्त्रांनी वार केले नाहीत."

"सत्याचा प्रचार करण्यासाठी तुला देशभर फिरावे लागणार, रानावनातून, जंगलातून जाताना तुझ्यावर दरोडेखोरांशी सामना करण्याची वेळ आल्यावर तू काय करशील?" भगवान बुध्दांनी परत शिष्याला विचारले, "हे भगवान त्या लोकांनाही मी समजून घेईन की, त्यांनी मला शस्त्राने मारले नाही व मला त्यांनी जिवंत सोडले म्हणून त्यांचे परत एकदा आभार मानीन." भगवान बुध्द परत एकदा गंभीर होऊन बोलले, "काही कट्टरपंथी लोक तुझ्यावर हल्ला करतील, ते दरोडेखोर तुझा जीव घेण्याचा प्रयत्न करुन तुला जखमी करतील, त्यात तुझा अंत सुध्दा होईल." त्यावर शिष्य म्हणाला, "मी त्या सर्वांचे आभार मानेन. माणसाला मृत्यू येणे हे स्वाभाविक आहे. प्रत्येक माणसाला एक दिवस मरावे लागणारच आहे. एका श्रध्दाळू भक्ताचे सौभाग्य असं कोणतं असणार आहे? असे सौभाग्य प्रत्येक भक्ताला सद्गुरुच्या आशीर्वादाने प्राप्त व्हावे की त्यांच्या विचारांचा प्रचार करता-करता आपले कर्तव्य करत मरण यावे." असे नम्रतापूर्वक व नतमस्तक होऊन सांगितले.

अशाप्रकारे शिष्याचे म्हणणे ऐकून महात्मा भगवान बुध्द प्रसन्नपूर्वक आशीर्वाद देऊन सांगितले की, "तू सत्याचा प्रचार करण्यास अवश्य जा, सच्चा प्रचारक जो आहे, कोणत्याही वेळी, कशाही अवस्थेत कोणाचेही वाईट करण्याची मनात इच्छा धरणार नाही. जो प्रत्येक विचारांमध्ये चांगले शोधण्याचाच प्रयत्न करणार व सत्याचा प्रचार करीत राहील. जा माझा तुला आशीर्वाद आहे."

वेळ कुठलीच शुभ किंवा अशुभ नसते. माणूस आपल्या पराक्रमाने, कर्तव्याने एखाद्या वेळेला महत्व आणून देतो.

(पान ३७ वर)

कर्तव्याने घडतो माणूस

कर्तव्य हे कर्माचे अंग आहे आणि जीवनात कर्तव्यच नसेल तर ते जीवन अळणी आहे. आई मुलाला जन्म देते, त्याचे पालन-पोषण, संगोपन करते. त्या बालकावर योग्य असे संस्कार घडवते. त्याच्या जीवनाला योग्य असा आकार द्यायचा प्रामाणिक प्रयत्न करते, त्यामध्ये कुठल्याही प्रकारचा स्वत:चा स्वार्थ न ठेवता आपल्या मुलासाठी रात्ररात्र जागून जी सेवा शुश्रूषा करते, ते तिच्यासाठी एक तपच असते.

भाजी बाजारात कढीपत्ता मिळतो. गृहिणी त्याला सर्वप्रथम फोडणीला टाकतात. परंतु खाताना तोच कढीपत्ता सर्वप्रथम ताटाच्या बाहेर काढून ठेवतात. अशाच प्रकारे माता-पिता प्रथम आहेत. परंतु ते वृध्द, दुर्बल, शक्तिहीन होतात तेव्हा काहीवेळा त्यांना उचलून वृध्दाश्रमात ठेवले जाते.

रामचरितमानसमध्ये एका ठिकाणी भगवान श्री रामचंद्र सीताजींना समजावितात.

एही ते अधिक धरमु नही दुजा।
सादर सास ससुर पद पूजा।।

अशाप्रकारे कुटुंबातील प्रत्येक सदस्याची आपापली धर्म (कर्तव्य) आहेत. लौकिक धर्म पालनानेच समाजामध्ये शांती, समृध्दी नांदते.

एकदा ब्रह्मदेव मानवाला म्हणाले, तुम्हाला तुमच्या वर्णपरत्वे उचित असा स्वधर्म नावाचा यज्ञ (आचरण) सांगतो. त्याची उपासना करा म्हणजे तुमच्या सर्व इच्छा आपोआप पूर्ण होतील. तुम्हाला व्रतनियमांच्या भरीस पडावयास नको, तपश्चर्याने शरीर दंड सोसावयास नको, किंवा दूरदूरच्या तीर्थयात्रांनाही जावयास नको. योगादी मोक्षाचे नानाप्रकारच्या कामिक उपासना, मंत्र तंत्राचे प्रयोग यांच्या नादी लागायला नको, नाना देवतांचे भजनही तुम्ही मुळीच करु नका. केवळ स्वधर्माचरणाने घडणारे आचरण करीत जा. तुम्ही मनात कोणताही स्वार्थ न ठेवता स्वधर्माचे अनुष्ठान करा, जशी पतीव्रता आपल्या पतीची आराधना एकनिष्ठेने करते तेच तसे तुम्ही तुमच्या आचरणाद्वारे सिध्द करा. हेच तुमचे कर्तव्य आहे (ज्ञानेश्वरी अध्याय ३ रा)

जर कुठल्याही व्यक्तीमध्ये सत्य, पावित्र्य आणि नि:स्वार्थपणा हे तिन्ही गुण विद्यमान असतील तर या ब्रह्मांडामध्ये कोणी त्याचे काही बिघडवू शकणार नाही. तो साऱ्या जगाचा सामना करु शकेल. संत तुकाराम महाराज म्हणतात.

धर्म तो न कळे। काय झाकशील डोळे।।
जीव भ्रमले याकामी। कैसी कळो येती वर्मे।।

धर्माला जिवंत ठेवण्यासाठी मानवतेला अंगीकृत करणे गरजेचे आहे. मानव मानवाला समजून घेणे यातच मानवाचे भले आहे. कारण "मानवता" हाच खरा धर्म आहे.

कर्तव्याचे क्षेत्र कोणतेही असो, परंतु जेथे अहंकार अभिमान निर्माण होतो. तेव्हा माणसातला 'मी' जागा होतो. जसं अवतारवाणीमध्ये म्हटले आहे.

नाना कर्मे आचरली मी अमाप ऐसे केले दान।
धर्म जातीचे भूत शिरावर बहू केला ऐसा अभिमान।
असून निरक्षर अन् अज्ञानी समजत होतो मी विद्वान।
नियमबध्द मी कर्मे करीतो ऐसा होता मज अभिमान।

(स.अ.वा.पद क्र.२७२)

अभिमान कुणालाचा सोडत नाही. कारण मी - माझे, मला ही भावना जात नाही तोवर अहंकारातून मुक्ती नाही.

एकदा स्वामी विवेकानंद व त्यांच्या शिष्यांमध्ये विनाशाकडे नेणारी बाब कोणती ? या विषयावर चर्चा चालली होती. प्रत्येक शिष्य आपले विचार यासंदर्भात व्यक्त करु लागले. बराच वेळ झाला परंतु समर्पक आणि सत्य उत्तर त्यांना सापडेना, स्वामी विवेकानंद ही चर्चा ऐकत होते. सुहास्य वदनाने स्वामी विवेकानंद म्हणाले, "हा प्रश्न कोणी उपस्थित केला? यावर एक शिष्य उत्तरला 'मी.'" विवेकानंदजी म्हणाले, "हा 'मी' च मनुष्याला विनाशाकडे नेतो."

'मी माझे' ही भावना ज्याच्या हृदयात तिळमात्र नसते तो पुरुष नित्य संन्यासी समजावा.

तात्पर्य :- आपल्या जीवनात 'मी' या शब्दाला स्थान नसावे. मी-मला-माझे या शब्दाचा वापर माफक आणि अत्यावश्यकतेनुसार असावा. कारण 'मी' मुळे अहंकार उत्पन्न होतो. अहंकार हा क्रोधाचा भाऊ आहे आणि तो विनाशाचे लक्षण आहे. कर्ता भाव आपल्याकडे येतो तेव्हा अभिमान जागृत होतो. पहा-एका काठीने कोणाला मारलं,

झोडलं, त्याला इजा नुकसान झाले तरी काठीला शिक्षा होत नाही किंवा त्या काठीने कोणाचा जीव वाचविला तरी त्या काठीला बक्षीस मिळत नाही. कारण काठीला ज्याने धारण केले आहे, कर्ताभाव त्याच्याकडे जातो.

मागील ग्रंथ, पुराण, इतिहास पाहिला तर आपली कर्तव्ये विसरुन ज्यांनी ज्यांनी वृथा अभिमान केला ते-ते राजे महाराजे सम्राट असून सुध्दा खऱ्या अर्थाने नांव लौकिकाला पोचले नाहीत. त्यांचे कोणी आदराने नाव घेताना दिसत नाही. कंस, दुर्योधन, हिरण्यकशपू, रावणादींची नांवे कोणी धारण करीत नाहीत. म्हणून प्रत्येक युगात वली, पीर-पैगंबरांनी माणसाला मनुष्य बनण्याची प्रेरणा दिली. कुणा पशूला , बैल, घोडा, हत्ती, गाढवाला दिली नाही.

पशू पक्षी हे नसती विचारी पण माणसापेक्षा तीच बरी।
घात न करती कधी कुणाचा पण मानव मानवावर वार करी।
जमिनीच्या एक तुकड्यासाठी भाऊ भावाची मान धरी।
व्यसनाच्या आहारी जाऊनी पती पत्नीचा खून करी।

बाह्य जगतात पाहिलं तर सारे कसे भयानक दिसते, महागाई, भ्रष्टाचार, बेकारी, बलात्कार, दरोडे हे नित्याचे झाले आहे. माणसाने माणुसकीला लाजवले आहे.

अब कौन इंतजार करे रात के अंधेरेका।
दिनके उजाले मे क्या-क्या नही होता है।
(निरंकारी बाबाजी)

पूर्वी चोर लुटारु रात्रीचा अंधार पडायची वाट पहात असत, मात्र आता दिवसा ढवळ्या हे सर्व प्रकार होत आहेत.

वर्तमान सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज साऱ्या विश्वाला आज हाच संदेश देत आहेत की माणसा तू माणुसकीला पात्र बन, यातच तुझे आणि इतरांचेही भलं आहे. वैर, निंदा, अहंकार, घृणा, दुष्टभावना अंगी असणे ही अधोगती आहे. तर दया, करुणा, प्रेम, नम्रता, सहनशीलता सत्कारांची भावना यातच मानवधर्माचे पालन आहे.

साधु संतांनी वली पीर पैगंबरांनी कर्तव्य पूर्तीसाठी हाच संदेश, हाच मंत्र अखिल मानवमात्रासाठी दिला आहे.

गुरुसिख भक्ताचे हेच कर्तव्य बनते की, सदगुरु कडून येणाऱ्या वचनांचा आदर करुन ती धारण करणे.

गुरुके वचन पे चलना है मुश्कील।
लेकिन चलने वालो ने पायी है मंझील।

तानाजी नारायण शिंदे
मु.पो. धोपेश्वर, खंडेवाडी
ता.राजापूर, जि.रत्नागिरी

आयुष्याचा पहिला धडा ... (पान ३५ वरुन)

ज्याप्रकारे घरासाठी पायरीची गरज असते, त्याचप्रमाणे मनुष्याच्या जीवनात कर्तव्याची आवश्यकता असते. विसरणे हा माणसाचा गुणधर्म आहे पण लक्षात ठेवणे हे कर्तव्य आहे. काहीतरी कोणाचे उच्च कर्तव्य डोळ्यापुढे ठेवून त्यात आपले आयुष्य, धन, बळ, बुध्दी व विचार खर्च करण्यातच जन्माचे सार्थक आहे.

समयाचे सद्गुरु बाबा हरदेवसिंहजी महाराजांनी मानवाला संदेश दिला, "कुछ भी बनो मुबारक है, पहले इन्सान बनो।" मानवाने जन्माला आल्यानंतर प्रथम आपलं कर्तव्य कोणतं ? ह्याचा शोध घ्यावा. आत्मा व परमात्म्याची ओळख करुन घेण्याची गरज आहे. जसे बाबाजींनी एका दिपकाचे कार्य कसे आहे ते खालील प्रमाणे सांगितले,

एक दिपक घर के अंदर, घरमें उजाला करे।
एक दिपक घरके बाहर, स्वागत तुम्हारा करे।
एक दिपक चौराहपे, सबका आधार बने।

एक दिपक स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देतो. एक सूर्य स्वतः ब्रह्मांडात तळपतो व विश्वाला उष्णता देतो, प्रकाश देतो. त्याच्या उष्णतेमुळे निसर्गातील पाच तत्त्वे कार्य तत्पर बनतात व विश्वात संचार निर्माण करतात. वारा वाहू लागतो, पाऊस पडतो, जमिनीत धान्य उगवते व ते धान्य माणसाला, पशू-पक्ष्यांना खाण्यास मिळते. ह्या निसर्गाच्या कर्तव्यातून माणसाने शिकायचे आहे. जसे अवतारवाणीत शेवटी म्हटले आहे,

सद्गुरुला तो सेवक प्रिय पालन पाच प्रणांचे करी।
सद्गुरुला तो सेवक प्रिय सेवा विनम्रतेने करी।
सद्गुरुला तो सेवक प्रिय भक्तांचा सत्कार करी।
सद्गुरुला तो सेवक प्रिय गुरु संगतीवर प्रेम करी।
सद्गुरुला तो सेवक प्रिय संत जनांचे गुण गाई।
अवतार म्हणे गुरु अंतर्यामी पाहून त्या हर्षित होई।
(अ.वा.पद ३७६)

सौ. जयश्री रामदास लांडे
शिवसाई महाराष्ट्र नगर, कल्याण (प.)

कर्तव्यासाठी कर्तव्य

आध्यात्मिक क्षेत्रामध्ये कर्तव्याला अतिशय महत्त्वाचे स्थान प्राप्त आहे. मनुष्याने केवळ स्वत:पुरताच विचार केला तर तो त्याचा स्वार्थ आहे. त्याचा परिणाम चांगला असेलही परंतु, त्याच्या बरोबर अहंकारही येतो. आणि मनुष्याला कितीही फायदा झाला तरी त्याचा काहीही उपयोग होत नाही. जोपर्यंत आपल्या देशातील लोक कर्माचे, मेहनतीचे महत्त्व समजू शकणार नाहीत तोपर्यंत देशाची स्थिती सुधारणार नाही. आपण पाहतच आहोत की सामाजिक कर्तव्ये व कर्माकडे पाठ फिरवण्याचे नाव भक्ती नसून पूर्ण निष्ठेने आपण आपल्या कर्तव्य-कर्माचे पालन करीत असताना निराकार प्रभूची इच्छा हसत-हसत स्वीकारणे हीच आपल्यासाठी खरी भक्ती आहे. जो आपली कर्तव्ये निभावतो, आपले उत्तरदायित्व निभावतो त्याला सर्वप्रकारचे हक्कही प्राप्त होतात. जगात, समाजात, घराघरात आज जे क्लेश पाहतो ते हक्कांनाच समोर ठेवल्याने आहेत. कर्तव्यांना आम्ही मागे सोडतो. हक्कासाठी प्रत्येक जण लढतोय. हक्काचं कामच लढवायचं आहे. कर्तव्याचं काम वाचवणं आहे. म्हणूनच हसती दुनिया मराठी मासिकातलं एक उदाहरण आहे - कर्तव्यासाठी कर्तव्य.

एका खेडेगावात एक ज्योतिषी राहत होता. बारा वर्षे पावसाचा थेंबही पडणार नाही, असे भविष्य त्याने वर्तविले होते. योगायोग असा, त्याप्रमाणे चार-पाच वर्षे पाऊस अजिबात झाला नाही. पाऊस न पडल्याने विहिरी, नद्या, तलाव कोरडे ठणठणीत पडले. उपासमार टाळण्यासाठी बहुतेक लोकांनी स्थलांतर केले. त्यानंतर एकदा आपल्या वर्तविलेल्या भविष्याची प्रचिती पाहण्यासाठी तो ज्योतिषी त्या खेडेगावात आला, कारण इतर लोकांप्रमाणे तोही ते खेडेगाव सोडून दुसरीकडे गेला होता. खेडेगावात आल्यावर पाहतो तर काय? सर्व खेडेगाव उजाड आणि ओसाड दिसले! परंतु गावाबाहेर एका उजाड शेतात एक शेतकरी त्याचे शेत नांगरताना दिसला. ज्योतिषाने त्या शेतकऱ्यास विचारले, "अरे बाबा! कशासाठी हे व्यर्थ कष्ट करतोस? बारा वर्षे पावसाचा थेंबही पडणार नाही, या माझ्या भविष्य कथनाचा तुला अनुभव आला ना?" तेव्हा शेतकरी म्हणाला, "तुमचे भविष्य खरे असेलही, पण मी जर बारा वर्षे शेत नांगरले नाही तर जेव्हा तेराव्या वर्षी पाऊस पडेल तेव्हा मी नांगरण्याची कलाच विसरुन जाईन. कर्तव्याचा विसर पडू नये म्हणून मी जमीन नांगरत आहे." शेतकऱ्याचे बोल ऐकून ज्योतिषी हसला आणि पुढे निघून गेला. ज्योतिषी थोडा पुढे जातो न जातो तोच आकाश एकदम ढगाळून आले. विजा चमकू लागल्या. पावसाचे चार थेंब ज्योतिषाच्या डोक्यावर पडले. ज्योतिषी वरुणराजास विचारु लागला, "तू बारा वर्षे पाऊस पाडणार नव्हतास ना? मग हे कसे घडले?" त्यावर वरुणराजाने उत्तर दिले, "तुझे आणि त्या शेतकऱ्याचे बोलणे मी ऐकले. मी सुध्दा शेतकऱ्याप्रमाणे विचार केला की, बारा वर्षे आपण पाऊस पाडला नाही, तर तेराव्या वर्षी आपण आपले कार्यच विसरुन जाऊ, तसे घडू नये म्हणून मी पाऊस पाडण्याचा सराव करीत आहे."

सांगण्याचे तात्पर्य असे आहे की, कर्तव्यासाठी कर्तव्य करावे. केलेल्या कर्मातून आपले भविष्य घडवता येते. आपले कर्तव्य पार पाडणाऱ्या माणसाला ईश्वर योग्य ते फळ देतो. सदगुरुचं जीवन जर पाहिले तर ते कळून येईल. आपला परिवार सोडून, कर्तव्याला विसरुन चालणार नाही. आपले जीवन निरंकार प्रभूला अर्पण करणे हीच खरी संत महात्म्यांची जीवन जगण्याची कला आहे. जो आपली कर्तव्ये निभावतो, आपले उत्तरदायित्व निभावतो त्याच व्यक्तीला समाजामध्ये जीवन जगताना मान-सन्मान मिळत असतो.

कु. रंजना पिलाजी भांगरे
मुलुंड (पूर्व), मुंबई

कर्तव्य मानवाचं - ब्रह्मज्ञान प्राप्तीचं

गुरुनानकजींच्या जीवनातील ही कथा. लहान असताना नानकजींना त्यांच्या वडीलांनी त्यांना गुरुकुलात ठेवलं. त्यांच्या शिक्षकाचे नाव गोपाळ पांड्या असे होते. पहिल्याच दिवशी नानकांनी त्यांना "गुरुजी आपलं शिक्षण किती झालं?" असा प्रश्न केला. गुरुजी उत्तरले की, "मी गणितात विशेष प्राविण्य मिळविले आहे." त्यावर नानक म्हणाले, "मनुष्याचं मुख्य उद्दिष्ट म्हणजे परमेश्वराचं ज्ञान मिळविणे. ते जर मिळवलं नाही तर बाकी सारं व्यर्थ आहे. इतर ज्ञानाने भवबंधनातून मुक्त होता येत नाही. मुक्तीसाठी इतर शिक्षणाची जरुरी लागत नाही. मुक्ती म्हणजे फक्त ऐहिक प्रेम जाळून टाकायचे." पवित्र ग्रंथ अवतारवाणीच्या माध्यमातून बाबा अवतारसिंहजी महाराज समज देतात की,

कोणी दिधली सुंदर काया, कोणी जगता रचियले।
रवि चंद्राला कुणी बनविले, कुणा आकाशा निर्मियले।
कुण्या कारण आला जगती, अंती कुठे आहे जाणे।
अवतार म्हणे हे दैवी रहस्य गुरुकरवी जाणून घेणे।।

(अ.वा.पद क्र.३३३)

अवतारसिंहजी महाराज समज देतात की, आपल्याला हे सुंदर शरीर कोणी दिलं आहे. नित्य सेवा करण्याकरीता चंद्र, सूर्य, हवा, पाणी हे कुणी बनविले याची जाण करुन घेणे हे मानवी जीवनाचे आद्यकर्तव्य आहे. मानव असा एकमेव प्राणी आहे जो या ईश्वराची जाण करुन त्याला ओळखू शकतो. परंतु ज्याने हे सारं विश्व निर्माण केलं त्या परमात्म्याची ओळख केवळ सदगुरु करवीच होते. अशा या देवाहूनही श्रेष्ठ समजल्या जाणाऱ्या पूर्ण सदगुरुला शरण जाऊन त्यांच्या करवी ब्रह्मज्ञान प्राप्त करणे, या ईश्वराची ओळख करुन घेणे हेच मानवाचे आद्यकर्तव्य आहे.

लक्ष चौऱ्याऐंशी योनी फिरुन नरक यातना भोगल्यानंतर या आत्म्यास मानव काया प्राप्त होते. परंतु हा मानवाचा जन्म मिळाल्यानंतर मानवास आपल्या मूळ ठिकाणाचा विसर पडतो व माणूस मोह-मायेच्या अधीन होतो. नाती-गोती, पैसा-अडका यांची जमवाजमव करु लागतो. अपार कष्ट करुन काटकसर करुन सुख-दु:ख झेलत असतो. जाती-पातीच्या बंधनामध्ये अडकून अंधश्रध्देचा बळी पडतो. मानव पारंपारिक रुढीप्रमाणे अनेक प्रकारची कर्मकांड करीत असतो. आणि अशा या कर्मकांडात अधिकच रुतत जात असतो. माणूस अशा भवबंधनात अडकून देवी-देवतांच्या नावाने उपास करीत असतो. परंतु आपल्या आद्यकर्तव्याला म्हणजेच या भगवंताचा तपासच करायचा विसरुन जातो.

पाच तत्त्वाचे हे शरीर प्राप्त झाल्यानंतर मानवामध्ये मी पणाचा अहंभाव जागृत होतो. माझं-माझं म्हणत सर्वांशी वैरत्व पत्करतो. अनेक मोठ-मोठ्या पदव्या मिळविण्यात गुंतून जातो. परंतु मनुष्याचं मुख्य कर्तव्य म्हणजे परमेश्वराचं ज्ञान मिळवणं. आणि ते जर मिळवलं नाही तर सारं काही व्यर्थ. या संसारात पैशाच्या बळावर सर्वच गोष्टी विकत मिळतात. परंतु ब्रह्मज्ञान नाही. ब्रह्मज्ञान प्राप्त करावयाचं असेल तर पूर्ण सदगुरुला शरण येणे गरजेचे आहे.

ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर आपल्याला या खऱ्या ईश्वराची ओळख होते. मातेच्या पोटी असते वेळी कोणी रोटी दिली याची जाणीव होते. साऱ्या अंधश्रध्दा दूर होतात. पूजा-पाठ, उपास या साऱ्या गोष्टींचा विसर पडतो. ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर केवळ एक गोष्ट समोर दिसते आणि ती म्हणजे या कणाकणात भरलेलं या ईश्वराचं अस्तित्व. या परमात्म्याच्या दर्शनानं सारं काही एक समान वाटतं. मनामध्ये भरलेला मी पणाचा अहंकार गळून पडतो. सत्संग, सेवा, नामस्मरण या गोष्टींचं महत्त्व कळतं व खऱ्या भक्तीला सुरुवात होते. असे हे अनमोल ब्रह्मज्ञान पूर्ण सदगुरुकडून प्राप्त करुन घेणं हेच मानवाचं आद्यकर्तव्य आहे.

दिपराज दत्ताराम माने
मु.पो.फणसवळे (कोंडवाडी),
ता.जि.रत्नागिरी

सद्‌गुरुवचनाचं पालन हेच आद्यकर्तव्य

आध्यात्मिक जीवनामध्ये कर्तव्य या शब्दाचा अर्थ 'वचन पालन' असा होतो.आईच्या उदरामध्ये असताना आपण परमेश्वराला वचन दिले होते की, मला या घाणीतून मुक्त कर. मग मी तुला जाणून तुझे भजन करीन. आपला जन्म होतो तेव्हा आपण जे परमेश्वराला वचन दिले होते ते विसरतो. आपल्यावर मायेचा पडदा पडतो.

ईश्वराची, परमेश्वराची ओळख करणे हे महत्त्वाचे कर्तव्य आहे. ब्रह्मज्ञान प्राप्त केल्याने आपल्या जीवनाची वाटचाल एका चांगल्या दिशेने होते. आपले जीवन वैभवशाली बनते. ब्रह्मज्ञान हे असे माध्यम आहे की, त्यामुळे आपल्या जीवनाचा कायापालट होतो. असे हे पावन, पवित्र ब्रह्मज्ञान सद्‌गुरुने आपल्या भक्तांपर्यंत पोहचवले आहे. अखेरपर्यंत ते टिकवून ठेवणे हे देखील भक्ताचे कर्तव्य आहे. मग ब्रह्मज्ञान प्राप्त झाल्यानंतर देखील भक्ताचे एक कर्तव्य बनते की, जशी आज समयाच्या सद्‌गुरुला जी भक्ती प्रिय आहे, जी भक्ती सद्‌गुरुला आवडेल तशी भक्ती करणे भक्ताचे मुख्य कर्तव्य आहे. जसे अवतारवाणीच्या १६व्या पदामध्ये म्हटले आहे.

निरंकार हा सदैव सत्य नाम तयाचे सत्य असे।
होता आहे राहील पुढती रचनाही बेअंत असे।।

शहनशाह बाबा अवतारसिंहजी या पदामध्ये प्रतिपादन करीत आहेत की, निरंकार प्रभू हा कायमदायम राहणारे सत्य असून त्याचे नामही सदोदित सत्य आहे. हा ईश्वर, परमेश्वर कधी नव्हता असे नाही. तो पूर्वी होता, आज आहे आणि पुढेही राहणार असून त्याची रचनाही त्याच्याप्रमाणेच बेअंत आहे. म्हणून कोणतेही प्रकारचे कर्मकांड न करणे हे भक्ताचे कर्तव्य आहे.

जर एखादा मनुष्य ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर जीवनातील कोणत्याही समस्येचे समाधान करण्यासाठी सद्‌गुरुला सोडून एखादा सांसारिक आधार घेत असेल, तर तो निश्चित तो अजुनही भ्रमाच्या जाळ्यात अडकलेला आहे. त्याला निराकार प्रभू व साकार सद्‌गुरुच्या शक्तीवर विश्वास नाही. गुरुसिख प्रत्येक क्षणी, प्रत्येक पावलोपावली, प्रत्येक अवस्थेत गुरुच्या आश्रित होऊन जीवन जगतो. "हर वक्त हर हाल के भीतर जुडी गुरु से तार रहे।" हे भक्ताचे महान असे कर्तव्य आहे, वचन आहे, की, जास्तीत-जास्त आपण या निरंकाराच्या या सद्‌गुरुच्या सान्निध्यात राहायचे आहे.

भक्तांचे, संत महात्म्यांचे एक कर्तव्य किंवा एक वचन ते म्हणजे आपल्याला 'गुरुसिख' बनायचे आहे. ब्रह्मज्ञान प्राप्तीनंतर सद्‌गुरुरुपी नौकेचा आधार घेतल्याने मनुष्य संसाररुपी भवसागराच्या प्रवाहातून जीवनाचा प्रवास सहजपणे पार करु शकतो. अर्थात येथे सावधानता बाळगली जाते की, प्रत्येक गुरुसिख या नावेत गुरुमतानुसार राहतो; कारण तो जाणत असतो की या नौकेत बसणाऱ्यांनी मनमर्जी केली तर ती हानिकारक होऊ शकते. *Indighting in a boat is more dangerous than the tempest outside.*

ब्रह्मप्राप्तीनंतर जेव्हा गुरुसिख अवगुणांचा त्याग करुन गुरुच्या शिकवणीनुसार चालतो तेव्हा तो गुरुकृपेला पात्र होतो आणि गुरुसोबत मिशनच्या कार्याला वाहून घेतो. "संत जो जा भावे राम, राम सन्ता के एको काम।" मिशनच्या कार्यात तन, मन, धनाचे योगदान देण्याचा जो उत्साह आहे. त्याचे वर्णन अवतारवाणीतील ७व्या पदात केले आहे.

नाशिवंत आहे तन माझे मज नाही त्याची पर्वा।
गेली जरी संपत्ती सारी मज नाही त्याची पर्वा।
सारे जग जरी झाले वैरी मार्ग सोडणे शक्य नसे।
म्हणे अवतार वचन गुरुचे कुणा तोडणे शक्य नसे।

आपण जे सद्‌गुरुला, परमेश्वराला वचन दिले आहे ते अखेरच्या श्वासापर्यंत जपायचे आहे.

कु. सुरज सुधाकर अनभवणे
मु.पो. तिर्लोट, जि. सिंधूदुर्ग

माणुसकीने वाग मानवा... हेच तुझे कर्तव्य

मानव नेहमी भ्रमात राहून वाट चुकतो. कॅलेंडरच्या आधारे दिवसाचे, वर्षाचे मूल्यमापन तो करतो. पण आपल्या जीवनाचे व जीवनातील कर्तव्याचे पालन करणे विसरुन गेला आहे. आज प्राणीसुध्दा आपले कर्तव्य विसरलेले नाहीत. कुत्रा मालकाने टाकलेली भाकरी खाऊन घराची राखण करुन आपले कर्तव्य पार पाडतो. मग मानवालाच का आपल्या कर्तव्याचा विसर पडला आहे? याचे कारण म्हणजे केवळ आणि केवळ माणसाची दुष्ट प्रवृत्ती आहे.

पृथ्वीच्या पोटात असलेले गुणधर्म विज्ञान बदलू शकते. परंतु एका दुष्ट प्रवृत्तीच्या माणसाचे मन बदलण्याची ताकद विज्ञानामध्ये नसून ती अध्यात्मामध्ये आहे. विज्ञानाचा उपयोग मानवी सुखासाठी आहे. परंतु यामुळे आजचा मानव सुखी होण्याऐवजी दु:खीच होत आहे. कारण मानवी जन्म कशासाठी? व मानवतेचे कर्तव्य काय? या सर्व गोष्टी मानव आज विसरुन गेला आहे. मानवाने जर मानवी कर्तव्याचे पालन केले असते तर हे जग किती सुंदर झाले असते? जगामध्ये सर्वत्र शांतता पसरली असती. परंतु नाही. आज जगामध्ये मानव जातीच्या धर्माच्या पंथाच्या उच्च-नीचतेच्या नावावरती दंगली, बॉम्बस्फोट घडवून आणत आहेत. म्हणून एके ठिकाणी म्हटलं आहे की,

जाती-धर्माच्या तव्यावर संधीसाधू भाजतात पोळ्या।
गरीब बिचारी माणसं मेंढरं बनून छातीवर झेलतात गोळ्या।
बांधता येतील मंदिर-मस्जिद दुभंगलेली मनं जुळतील का?
विधवा झाल्या माता-भगिनी, कपाळी कुंकू असेल का?
मना-मनातील जहर अमुचे अमृताचे कुंभ व्हावे।
हरवलेल्या माणुसकीने पुन्हा एकदा फुलूनी यावे।

आज मानवाला हेच समजले नाही की ज्या जाती धर्मासाठी तू लढत आहेस त्या जाती धर्मातल्या मानवाचे रक्त एकच आहे. परमपिता परमात्मा हा एकच आहे.

द्वेष, ईर्षा, भांडण, तंटा यामुळे आज जगाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. आज भावी पिढी व्यसनाधीन होत आहे. आज माणसा माणसामध्ये वैर, ईर्षा, निंदा, तिरस्कार हे सर्व गुण भरल्यामुळे माणसाला आपल्या कर्तव्याचा विसर पडला आहे. म्हणून एका शायरने खूप सुंदर लिहीले आहे की,

देख तेरे संसार की हालत क्या हो गयी भगवान।
कितना बदल गया इंसान।
चाँद न बदला सूरज ना बदला ना बदला आसमान।
कितना बदल गया इंसान।।

आज बघायला गेले तर माणूस कुठेच दिसत नाही. कारण माणूस तरी नेमकं कोणाला म्हणावे हा प्रश्न खराच आहे. कारण माणसा सारखी दिसणारी माणसं जगात बरीच आहेत. आणि जसे दिसेल तसे असेल याची खात्री नसते म्हणून तर साधू वेशातील रावणाला सितामाई सुध्दा फसते. ही आज विश्वातील माणसाची तऱ्हा आहे. म्हणून आज समस्त विश्वातील मानवाला सदगुरु बाबाजी समजावतात की, मनुर्भव. माणसा तू माणूस बन. कारण जगामध्ये प्रेम राहिले नाही. माणूस माणसासारखा वागत नाही. माणसाला त्याच्या कर्तव्याचा पूर्णपणे विसर पडला आहे. त्यामुळे मानवी जीवनात अनिष्ट परिस्थिती निर्माण झाली आहे. म्हणून मानवी जीवनात आध्यात्मिक क्रांती घडवून आणने गरजेचे आहे. माणसाची मानसिकता बदलण्याचा हाच एक सोपा उपाय आहे. मी सुखी झालो पाहिजे, माझा उत्कर्ष झाला पाहिजे. या अनिष्ट मानसिकतेऐवजी आपण सर्वजण सुखी होऊया. आपण सर्वांचा उत्कर्ष साधूया अशी मानसिकता मानव जातीमध्ये निर्माण करण्याचे विलक्षण सामर्थ्य ठेवूया. माणूसकी हाच खरा धर्म व माणसाने माणसाबरोबर माणसासारखे वागणे हीच खरी माणसाची कर्तव्ये आहेत आणि आज जगतामध्ये निरंकारी मिशन याच माणसांच्या कर्तव्याची जाणीव वेळोवेळी मानवाला करुन देत आहेत. सदगुरु बाबा हरदेवसिंहजी महाराज आजच्या या मानवाला शाश्वत सत्याचे ज्ञान देत असून स्वर्गाप्रमाणे सुंदर धरती बनविण्याचा प्रयत्न करत आहेत.

कु. नितीन प्रकाश संकपाळ
मु.पो.रामपूर, ता.चिकोडी,
जि. बेळगांव (कर्नाटक)

वाचकांचे मनोगत

संत निरंकारी मराठी मासिक पत्रिकेचा मार्च महिन्याचा विशेष अंक वाचून आनंद मिळाला. आनंद काय परमानंदच म्हणा ना, अगदी स्वागत गीतापासून ते सद्गुरु बाबाजींच्या प्रवचनांपर्यंत विशेष इत्यंभूत माहिती देणारा हा अंक मनाला भावला.

दासीला पहिल्या आणि दुसऱ्या दिवशी काही सेवेमुळे समागमाचा आनंद घेता आला नाही, परंतु आपण व आपल्या प्रतिनिधींनी प्रत्येक वक्त्याचा मतितार्थ इतक्या सहज व सोप्या शब्दात पण इतका प्रत्यक्ष मांडला की, जणू समागम समोर सुरु असल्याची दृश्य डोळ्यांपुढे तरळत होती.

सद्गुरु बाबाजींच्या शोभायात्रा ते प्रवचनांपर्यंतचे सर्व छायाचित्रण इतके अप्रतिम होते की, जणू माऊलींचं पुन्हा दर्शन घेण्याचा आनंद मिळाला. खरंच संत निरंकारी मराठी मासिक पत्रिका विभागाचे आभार मानून, आज सद्गुरु बाबाजींच्या चरणी हीच प्रार्थना आहे की, संत समागमाची आठवण आणि उजळणी करवून घेणाऱ्या हा अंकाप्रमाणे सर्वांच्या आयुष्यात सद्गुरुच्या वचनामृताची उजळणी प्रत्येक क्षणाला होत राहो आणि आम्ही तुझी लेकरं तुझ्या दयादृष्टीला, कृपादृष्टीला सदैव पात्र बनत राहो.

प्रेषक - अश्विनी उमेश माने
ऐरोली, नवी मुंबई

आमच्या सारख्या पामराला भक्ती आणि मुक्ती मिळण्यासाठी मदतीचा हातभार म्हणून 'संत निरंकारी मासिक पत्रिका' बहूमोलाचे मार्गदर्शन करीत आहे. सद्गुरुचे संदेश, संताचे अनमोल विचार आपणापर्यंत पोहचविण्याचे कार्य प्रकाशन विभाग करीत आहे. आज खेड्यांमध्ये, दुर्गम भागामध्ये एवढेच नव्हे तर ए.पी.ओ., सीमारेषेवरील सैनिकांपर्यंत देखील ही मासिक पत्रिका सद्गुरुचा संदेश पोहचवत आहे. ज्यांना सत्संग मिळत नाही त्यांच्यासाठी ही मासिक पत्रिका म्हणजे जणू जीव की प्राणच, एक पर्वणीच आहे. मनामध्ये कोणताही मोह नसताना केवळ आणि केवळ सद्गुरुवचनामृत, संतवचने जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचविण्यासाठी झटणाऱ्या प्रकाशन विभागाचे खरोखर मनापासून आभार मानले पाहिजेत. मासिक पत्रिकांची दिवसेंदिवस होत असलेली प्रगती, सुंदर सजावट पाहून मन हर्षित होते. संत निरंकारी मराठी मासिकाचा अंक पाहून तर दिल्ली समागमला न जाताही समागमचा आनंद घेता आला. प्रकाशन विभागातर्फे दरवर्षी प्रकाशित होणारा विशेषांक पाहण्यासाठी मन आतूर झालेले असते. दरवर्षीप्रमाणे यावर्षीचा विशेषांक 'कर्तव्य' देखील सुंदर आहे. संत निरंकारी मंडळाकडे आकर्षित करणारा आहे. तसेच नवोदित लेखकांचे विचार वाचूनदेखील खूप काही शिकायला मिळाले. आ. महात्मा जगन्नाथ मडकरजी यांनी मानवाच्या सर्वच कर्तव्याबद्दल अतिशय सहजतेने सर्वांना कळेल अशा सोप्या भाषेत सांगण्याच प्रयत्न केला. तसेच आ. महात्मा सुरेश तिर्लोटकरजी यांनी देखील 'स्व-आचरणाची जाण' कवितेद्वारे करुन दिली. आ. परशुराम कारंडेजी, संगिता चव्हाणजी, लतिका पालवजी तसेच इतर सर्व कविता 'कर्तव्याची जाण' करुन देणाऱ्या आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आ. महात्मा प्रसाद सुखदेव सकटजी यांनी 'यंदा कर्तव्य आहे' या लेखामध्ये वेगळ्याच प्रकारे कर्तव्याची जाण करुन दिली. निःस्वार्थ भक्तीची सुरुवात प्रथम घरापासून झाली पाहिजे. यासाठी घरातील सर्व सदस्यांबरोबर मिळून मिसळून, प्रेम, नम्रता, आपुलकीने राहणे या मानवाच्या आद्य कर्तव्याची जाण महात्माजींनी आपल्या लेखणीद्वारे करुन दिली. जितका सुंदर हा 'कर्तव्य' विशेषांक आहे, तशीच सुंदरता आपल्या सगळ्यांच्या जीवनात येवो तसेच विशेषांकातील सर्व जाहिरातदारांच्या व्यवसायात प्रगती होवो अशी सद्गुरुचरणी प्रार्थना करुया.

तसेच फेब्रुवारी महिन्याच्या अंकातील संपादकीयमध्ये जे गुरुपूजेचे महत्त्व समजाविण्याचा प्रयत्न केला आहे ती गुरुपूजा सकलांना घडो.

प्रकाशन विभागाच्या या सर्व बहुमोल सेवेबद्दल मनःपूर्वक आभार!

प्रेषक - कु. सोनाली गुलाब चव्हाण
शहाड (कल्याण)

पाटणा (बिहार) मध्ये सद्गुरु बाबाजींच्या सान्निध्यात आयोजित बिहार आणि झारखंडच्या प्रादेशिक समागमचे दृश्य, व्यासपीठावर सोबत आहेत मातृशक्ती

पाटणा (बिहार) मध्ये आयोजित बिहार आणि झारखंडच्या प्रादेशिक संत समागम प्रसंगी आपले भाव व्यक्त करताना श्रध्दाळू

गुरुपूजा दिवसाप्रसंगी समागम मैदान, दिल्ली मध्ये आयोजित सेवादल रॅलीचे निरीक्षण करताना सद्गुरु बाबाजी, सोबत आहेत मातृशक्ती

Printed Matter
RNI No.59874/1993
Postal Regd No.MH/MR/EAST/91/2012-2014
Publishing date 27th of every previous month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 8th of every month

पाटणा (बिहार) मध्ये नवनिर्मित संत निरंकारी सत्संग भवनचे उद्घाटन करताना सद्गुरु बाबाजी, सोबत आहेत मातृशक्ती आणि प्रबंधक

समागम मैदान, निरंकारी चौक (दिल्ली) येथे आयोजित गुरुपूजा दिवस समारोह प्रसंगी व्यासपीठावर आसनस्थ सद्गुरु बाबाजी, सोबत आहेत मातृशक्ती

निरंकारी सरोवर परिसर, दिल्ली मध्ये 'एकत्वाचा फवारा'च्या उद्घाटन प्रसंगी सद्गुरु बाबाजी, सोबत आहेत मातृशक्ती आणि विशिष्ठ अतिथीगण